cmyk

## संपादकीय

### भाषा सक्ती केल्यास संघर्ष अटळ

राज्यात नवे शैक्षणिक धोरण व त्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या हिंदी भाषेच्या सक्तीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समर्थन केले आहे तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विरोध केला आहे. सरकार हा संघर्ष मुद्दाम घडवत आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरू आहे. या राज्यातील मराठीतर भाषिकांनी सरकारचा हा डाव समजून घ्यावा. त्यांना तुमच्या भाषेबद्दल विशेष प्रेम आहे, असे काही नाही. त्यांना तुमची माथी भडकवून स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–०१ | रविवार, दि.२० एप्रिल २०२ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### बोत्सवानातून भारतात येणार ८ नवीन चित्ते

भोपाळ : दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवाना येथून ८ चित्ते भारतात आणले जाणार आहेत. त्यांना दोन टप्प्यात आणले जाईल. त्यापैकी ४ चित्ते मे पर्यंत भारतात येतील, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. मध्य प्रदेश सरकारने जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, ही माहिती शुक्रवारी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली. ते केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत झालेल्या चित्ता प्रकल्प आढावा बैठकीत उपस्थित होते. ''दक्षिण आफ्रिका, बोत्सवाना आणि केनिया येथून आणखी चित्ते भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दोन टप्प्यांत ८ चित्ते भारतात आणले जातील. मे महिन्यापर्यंत बोत्सवाना येथून ४ चित्त्यांना भारतात आणण्याची योजना आहे. त्यानंतर आणखी ४ चित्त्यांना आणण्यात येईल. याबाबत भारत आणि केनिया यांच्यातील करारावर सहमती झाली आहे.

# मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बीड जिल्ह्यातील जनतेला अभिवचन; श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या नारळी सप्ताहाची सांगता

शिरूर । शंकर भालेकर

**मराठवाड्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी बीड जिल्ह्यासह मराठवाडा पाणीदार होणे गरजेचे आहे. मराठवाड्यातील या पिढीने दुष्काळ पाहिला आहे. मात्र मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नसल्याचे अभिवचन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे दिले आहे. गहिनीनाथ गडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगता प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, आ. सुरेश धस, आ. नमिता मुंदडा, आ. मोनिका राजळे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.**



बीड जिल्ह्यातील श्री.क्षेत्र गहिनीनाथ गडाचा ९३ वा नारळी सप्ताह महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे गेल्या आठ दिवसांपासून मोठ्या थाटामध्ये पार पडत होता या सप्ताहाची सांगता शनिवारी झाली. या सांगतेच्या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वातावरण व हवामान बदल तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना निमंत्रित करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ग्रामस्थांच्या वतीने वारकरी सांप्रदायाचा भगवा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित भाविकांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले बीड जिल्ह्याच आणि आमचे एक वेगळं नातं आहे, आणि जेव्हापासून श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर आमचे येणे होऊ लागले तेव्हापासून या नात्याला एक वेगळ्या प्रकारचा रंग आला आहे. मागच्या काळामध्ये श्री.क्षेत्र गहिनीनाथ गडाच्या विकासाचं कार्य हाती घेतलं ते आता बरेच पुढे गेलेले असून आणखी भरपूर कामे त्या ठिकाणी करायचे बाकी आहे. पंकजाताई म्हणाल्या त्याप्रमाणे गडाचा आणि गडाच्या पान २ वर

### भक्तांच्या विकासासाठी गड दत्तक घ्यावा–पंकजा मुंडे

बीड जिल्ह्यावरती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोठे प्रेम आणि लक्षही आहे. बीड जिल्ह्यामध्ये गडाची मोठी परंपरा आहे. श्री क्षेत्र गहिनीनाथ गड हा वारकरी संप्रदायामध्ये मोठा गड मानला जातो. या गडाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दत्तक घ्यावा ज्यामुळे गडाचा आणि गडावरती येणाऱ्या भाविक भक्तांचा सर्वांगीण विकास होईल म्हणजेच बीड जिल्हा सर्वतोपरी सुजलाम सुफलाम होईल अशी मागणी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी आपल्या भाषणातून मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली.

### पंकजा मुंडेच्या त्याविधानाचे मुख्यमंत्र्याकडून खंडण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड दत्तक घ्यावा आणि गडाबरोबरच भाविकांचाही विकास करावा, असे विधान मंत्री पंकजा मुंडे यांनी केले मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडाला दत्तक घेण्याची माझी ऐपत नाही, आणि माझी औकातही नाही. या उलट गडांनीच मला दत्तक घेतले तर गडाचा विकास करणे मी माझे कर्तव्य समजेल आणि गडासह येथील भाविकांचाही विकास करील, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री पंकजा मुंडे यांच्या त्या विधानाचे त्याच व्यासपीठावर खंडन केले.

## थोडक्यात...

### अमरावतीमध्ये संत्रा बागा धोक्यात

अमरावती– विदर्भातील वाढत्या तापमानाने अमरावती जिल्ह्यातील संत्र्याचा आंबिया बहार धोक्यात आला आहे. तापमानात अचानक वाढ झाल्याने संत्रा गळतीचे प्रमाण वाढले आहे. हजारोंचा खर्च करूनही फुलवलेल्या बागा उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.

### ससूनच्या अहवालावर सुप्रियांची टीका

पुणे– ससून रुग्णालयाने गर्भवती महिला प्रकरणात दिलेल्या अहवालावर सुप्रिया सुळे यांनी टीका केली आहे. आपणास हा अहवाल अमान्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे अहवालावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### सोयाबीन खरेदीसाठी लवकरच एमपी पॅटर्न

मुंबई : राज्यात हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीन खरेदीत आणखी सुधारणा करण्यासाठी सर्वाधिक खरेदी व साठवणूक करणाऱ्या मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यांचा पॅटर्न अभ्यासला जाणार आहे. मध्य प्रदेशात तेथील वखार महामंडळ ही खरेदी व साठवणूक करते, तर छत्तीसगडमध्ये गावपातळीवरील कार्यकारी सोसायट्या खरेदी करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना थेट फायदा होत असल्यानेच राज्यातही अशी खरेदी करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली असून, १५ मेपर्यंत अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

### मला बेल्स पाल्सी आजार झालाय– धनंजय मुंडे

मुंबई : आमचे सहकारी, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केलेल्या एका विधानावरून मला अर्धांगवायू झाल्याचे वृत्त काही वाहिन्यांवर प्रसारित केले जात आहे. मुळात मला बेल्स पाल्सी हा आजार दीड महिन्यांपूर्वी झालेला असून त्याचा परिणाम चेहऱ्यावर झाल्याने अजूनही मला बोलायला त्रास होतो. बाबासाहेब पाटील यांची व माझी दोन दिवसांपूर्वी एका बैठकीत भेट झाली होती. त्यांनी माझ्याबद्दल काळजी व्यक्त केली त्याबद्दल आभार. नव्याने मला कोणताही आजार झालेला नाही, असे आपल्या फेसबुक पोस्टवर धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

### पृथ्वी वाचवण्यासाठी देशपातळीवर काम करणार–पाशा पटेल

लातूर– २२ एप्रिलला जागतिक वसुंधरा दिवस आहे. हा वसुंधरा दिन देशातील ८ राज्यातील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती शेतकरी नेते पाशा पटेल यांनी दिली आहे. पृथ्वीवर अलिकडच्या काळात ५० अंश सेल्सिअस तापमान होणार आहे, असे बोलले जात आहे. त्यामुळे पृथ्वीवर माणूस जीवंत राहील का नाही? असा सवाल उपस्थित होत आहे

# महाराष्ट्राच्या हिताआड येणाऱ्यांच्या पंक्तीला नको

## राज यांच्या आवाहनाला उद्धव ठाकरे यांचा प्रतिसाद



**मुंबई । प्रतिनिधी**

**प्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या पॉडकास्टला मुलाखत देताना मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आमच्यातील वाद क्षुल्लक आहेत, पण महाराष्ट्र मोठा असल्याचे सांगत ते वाद, भांडणे महाराष्ट्रासाठी मिटवायला माजी तरी इच्छा आहे. पण माझ्या एकट्याच्या इच्छेचे काय समोरच्याची पण इच्छा असायला हवी, असे सांगत शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या कोर्टात बॉल टोलवला. राज ठाकरे यांच्या या आवाहनावर उद्धव ठाकरे लगेच प्रत्युत्तर देत म्हणाले की, मी ही किरकोळ वाद, भांडणे मिटवायला तयार आहे. महाराष्ट्राच्या हिताच्या आड येणाऱ्यांना घरी बोलावणार नाही की मी त्यांच्या घरी जाणार नाही, असे सांगत राज ठाकरे यांच्या आवाहनाला उद्धव ठाकरे यांनी प्रतिसाद दिला.** पान २ वर

### “ ही रक्ताची नाती, मुंबई आणि मराठी माणसासाठी एकत्र यावेच लागेल – संजय राऊत

राज ठाकरेंची भूमिका नाकारण्याचा करंटेपणा आमच्याकडून होणार नाही, मुंबई आणि मराठी माणसांसाठी एकत्र यावचं लागेल असे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले आहेत. राज ठाकरेंनी आता कुठे मन मोकळं केलं, त्याला आम्ही प्रतिसाद दिला. आता आम्ही वाट बघतोय असेही सूचकपणे संजय राऊत म्हणाले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघेही भाऊ आहेत, ही रक्ताची नाती आहेत असे सांगत संजय राऊतांनी एक प्रकारे राज ठाकरेंना युतीसाठी साद घातल्याचे दिसत आहे. उद्धव ठाकरेंसोबत मी यावर चर्चा केली आहे, आम्ही हवेत बोलत नाही. मराठी माणसावर कोणी घाव घालत असेल तर आम्ही साद देण्याची वाट पाहू. याहून चांगले काही होण्याची आम्ही वाट पाहू असे संजय राऊत म्हणाले.

# शेट्टी-कडू-जानकर तीन दिग्गज आज एकाच मंचावर!

## राजकीय वर्तुळाचे लागले लक्ष



**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय समाज पक्ष आयोजित युवा संघर्ष निर्धार परिषदेच्या निमित्ताने शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, प्रहारचे बच्चू कडू आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर हे एकाच व्यासपीठावर दिसणार आहेत. रविवारी (दि.२०) होणाऱ्या या परिषदेत हे तीन नेते काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ पान २ वर

# रणजित कासले विरोधात परळी पोलिसात फिर्याद

## निवडणूक प्रक्रियेत परळीत ड्युटी नसताना खोटे आरोप केल्या प्रकरणी गंभीर गुन्हे दाखल

**परळी । प्रतिनिधी**

परळी विधानसभेच्या निवडणूक प्रक्रियेत किंवा मतमोजणी तसेच ईव्हीएम च्या सुरक्षेच्या संदर्भात कोणतीही ड्युटी नसताना, केवळ खळबळ माजवण्याच्या उद्देशाने खोटे, चुकीचे आरोप करणाऱ्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याच्या विरोधात परळीचे तहसीलदार (निवडणूक) यांनी परळी पोलिसात फिर्याद दिली असून, कासले विरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याला निवडणूक, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी दरम्यान कुठेच परळी विधानसभा मतदारसंघात ड्युटी दिलेली नव्हती. ईव्हीएम मशीन ची सुरक्षा केंद्रीय राखीव पोलीस बल व राज्य राखीव पोलीस दलाचे जवान यांच्या देखरेखीत व पूर्णवेळ सीसीटिव्ही कॅमेरे मध्ये झाली होती. त्यास निवडणूक निरीक्षक तसेच सर्वपक्षीय उमेदवार प्रतिनिधी साक्षीदार आहेत. मात्र तरीही कासले याने समाज माध्यमांवर व्हायरल केलेल्या व्हिडिओच्या माध्यमातून आपल्याला ईव्हीएम ड्युटी होती, तिथे ड्युटीवर गप्प राहायचे यासाठी पान २ वर

# स्व.बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांना पंकजाताई मुंडेंनी दिला मायेचा आधार!

**बीड । प्रतिनिधी**

भाजपचे जिल्हा विस्तारक स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांशी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दुपारी दूरध्वनीवरून संवाद साधला. आगे कुटुंबाला आर्थिक मदत करत त्यांच्या पत्नीला नोकरी मिळवून देण्याचा शब्द त्यांनी दिला. बीडच्या पुढील दौऱ्यात आपण आगे परिवाराची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### * जिल्हाध्यक्षा मार्फत मदत सुपूर्द; पत्नीला नोकरी देण्याचा दिला शब्द

### * अचानक मुंबईला जावे लागल्याने पुढील दौऱ्यात परिवाराला भेटणार

ना. पंकजाताई मुंडे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत घाटशीळ पारगाव येथे नारळी सप्ताहात उपस्थित होत्या. नियोजित दौर्यानुसार त्या किट्टी आडगाव येथे जाऊन स्व. बाबासाहेब आगे यांच्या परिवाराला पान २ वर

# बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करा – मिथुन चक्रवर्ती

कोलकाता । वृतसंस्था

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद हिंसेनंतर या ठिकाणी राजकारणाला उत आला आहे. भाजप नेते आणि ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांनी हिंसेवर मोठे वक्तव्य केले आहे. त्यांनी म्हंटले की, मी केंद्रीय गृह मंत्र्यांना अपिल करतो की, त्यांनी बंगालमध्ये राष्ट्रपती शासन लागू करावे. तसेच बंगालमध्ये पुढच्या निवडणुका या सैन्याच्या उपस्थितीत करण्यात याव्यात. आम्हाला बंगालमध्ये निष्पक्ष निवडणूका हव्या आहेत असे ते म्हणाले. भाजप नेते आणि चित्रपट अभिनेता मिथुन पान २ वर

# तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर गुन्हा दाखल; ससूनच्या अहवालानंतर पोलिसांची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुण्यातील अलंकार पोलिस स्टेशनमध्ये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात पुणे पोलिस आयुक्ताना ससून पान २ वर




## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ३६.०० क्विंटल | २,४३१ | ३,१०० | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड: १५७.०० क्विंटल | १,७०० | २,९७० | २,३४६ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६०.०० क्विंटल | २,३७५ | ४,४०१ | २,८६२ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,४०० | ४,४५० | ४,४३३ |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ५,५०१ | ५,५११ | ५,५०६ |

# पीकविम्याचे सतराशे कोटी आठवडाभरात शेतकऱ्यांच्या खात्यात

## कृषी विभागाने केले जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

**खरिप हंगाम २०२४ मधील विमा भरपाईच्या रकमेत वाढ झाली. आतापर्यंत शेतकऱ्यांना ३ हजार १७५ कोटी रुपयांची भरपाई निश्चित झाली आहे. त्यापैकी कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यात १ हजार ४७३ कोटी रुपये जमा केले. तर १ हजार ७०२ कोटी रुपयांची भरपाई विमा कंपन्यांकडे प्रलंबित आहे. ही भरपाई विमा कंपन्या शेतकऱ्यांच्या खात्यात आठवडाभरात जमा करतील, असे कृषी विभागाने सांगितले.**

राज्यात खरिप हंगाम २०२४ मध्ये एकूण ९ कंपन्यांनी विमा योजना राबविण्याचे काम केले. शेतकऱ्यांनी स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणी पश्चात नुकसानीच्या अनेक तक्रारी केल्या होत्या. या तक्रारीनंतर नुकसानीचे पंचनामे करून विमा कंपन्यांनी नुकसान भरपाई निश्चित केली आहे. तसेच पीक कंपनी प्रयोगावर आधारित भरपाई देखील कंपन्यांनी निश्चित करण्याचे काम सुरु केले,



असेही कृषी विभागाने सांगितले. पीकविम्याच्या नियमानुसार राज्य आणि केंद्र सरकारने आपल्या हिस्स्याचा विमा हप्ता दिल्यानंतरच विमा कंपन्या शेतकऱ्यांना वेगवेगळ्या ट्रीगरअंतर्गत निश्चित नुकसान भरपाई देतात. केंद्र सरकार आपल्या हिस्याचा विमा हप्ता लवकर जमा करते. मात्र राज्य सरकारच्यावतीने उशीर होतो. केंद्र आणि राज्याचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून मिळणारी भरपाई पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भाषा सक्ती केल्यास संघर्ष अटळ

राज्यात नवे शैक्षणिक धोरण व त्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या हिंदी भाषेच्या सक्तीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समर्थन केले आहे तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विरोध केला आहे. सरकार हा संघर्ष मुद्दाम घडवत आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरू आहे. या राज्यातील मराठीतर भाषिकांनी सरकारचा हा डाव समजून घ्यावा. त्यांना तुमच्या भाषेबद्दल विशेष प्रेम आहे, असे काही नाही. त्यांना तुमची माथी भडकवून स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे.

इयत्ता पहिलीपासूनच मराठीबरोबर इंग्रजी, हिंदी भाषा शिकणे आणि शिकवणे अनिवार्य होणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार हिंदी भाषेचे धडे महाराष्ट्रातील मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून घ्यावे लागणार आहेत. शैक्षणिक धोरणात केवळ भाषा या मुद्यावर आग्रही भूमिका घेऊन भागणार आहे का? इयत्ता आठवीपासूनच संगणक, संगणकीय भाषा, सॉफ्टवेअर, हार्डवेअर, कृत्रिम प्रज्ञा, भ्रमणध्वनी दुरुस्ती हे कौशल्य शिक्षण सक्तीचे करण्याबाबत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विचार होत नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे. रंगारी, जोडारी, गवंडी, सुतार, प्लंबर याबाबतच्या कौशल्य शिक्षणाची निवड करण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. खेळाच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार एखादा खेळ निवडल्यानंतर त्या खेळात प्रावीण्य मिळवण्यासाठी शिक्षण प्रवासातच मुलांना मार्गदर्शन, मदत आणि प्रोत्साहन मिळाले पाहिजे. सर्वच भाषांना महती आणि महत्त्व आहे. उदयोन्मुख तरुणाईला आदिवासी, दुर्गम भागात जाऊन समाजसेवा करण्यासाठी माडिया, वारली यासारख्या आदिवासी भाषा शिकाव्यात असे वाटले तर त्यात गैर काय? भाषा कोणती शिकावी याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. पहिलीपासूनच हिंदी भाषा अनिवार्य करून राज्य सरकार लहान मुलांवर अन्याय करीत आहे. एकतर कडक उन्हाळ्यात शाळा चालू ठेवून आधीच मुलांवर अन्याय झाला आहे. त्यांना अन्य सुविधा मिळण्यासाठी सरकारने काय प्रयत्न केले आहेत? केवळ शासन निर्णय अमलात आणण्याआधी विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा अभ्यास कोण करणार? खरे तर हिंदी भाषा मंत्र्यांना शिकवण्याची खरी गरज आहे. कारण हिंदी बोलताना त्यांची वाक्यरचना, मराठी शब्दांचा भडिमार ऐकून मनोरंजनच होते. म्हणून आधी मंत्र्यांना हिंदी शिकवण्याची गरज आहे. राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकावी लागणार आहे. या नव्या शैक्षणिक धोरणाला विरोध होत आहे. मुळातच देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भाषा हा विषय अस्मितेचा आणि जिव्हाळ्याचा राहिला आहे. राज्यघटना लागू झाल्यानंतर १५ वर्षे अधिकृत कामासाठी इंग्रजीचा वापर करण्यात आला. संसदेने नंतर कार्यालयीन भाषा कायदा १९६३ मध्ये पारित केला. त्यानुसार संसदीय कामकाजासाठी हिंदीबरोबर इंग्रजी भाषेचा वापर १९६५ नंतरही चालू राहिला. १९९७ मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि काही बाबतीत इंग्रजी भाषेचा वापर बंधनकारक करण्यात आला. मात्र तरीही हिंदी ही राष्ट्रभाषा होऊ शकली नाही किंवा हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली नाही. १९६३ मध्ये द्विभाषा सिद्धांत स्वीकारण्यात आला तर त्रिभाषा सिद्धांत नाकारण्यात आला. म्हणजेच हिंदी व इंग्रजी या कामकाजाच्या भाषांचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे आता त्रिभाषा हा सिद्धांत लागू करण्याची काहीच गरज नव्हती. अनिवार्य करण्याचीही गरज नव्हती. आता त्रिभाषा सूत्र अनिवार्य करण्यात आल्याने विद्यार्थ्यांचा संस्कृत, पाली यासह अन्य भाषांकडे ओढा राहणार नाही. कारण तीन भाषा वर्गातच शिकाव्या लागणार असल्यामुळे विद्यार्थी साहजिकच आपली आवड म्हणून चौथी भाषा शिकू शकणार नाहीत. त्यामुळे केंद्राने त्रिभाषा सूत्राचा पुन्हा एकदा नव्याने विचार करण्याची खरी गरज आहे. भाजपशासित राज्ये त्रिभाषा सूत्राचा स्वीकार करणे साहजिक आहे. मात्र, दक्षिणेतील तसेच बिगर भाजपशासित राज्ये या सूत्राला चपराक देतील हे उघड आहे.

# आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखण्याचे प्रशिक्षण

## आदित्य शिक्षण संस्थेचा उपक्रम : विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग, बीड, छत्रपती संभाजीनगरच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

**बीड । पतिनिधी**

**शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखता यावी यासाठी संस्थेच्या वतीने एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यामध्ये बीड आणि छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पत्येक्ष अन्न पदार्थांमधील भेसळ कशी ओळखावी यासाठी प्रात्यक्षिक करून दाखवले.**



आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्येक विषयाचा बारीक अभ्यास व्हावा. त्यांना भविष्यात त्या विषयाचे ज्ञान आपल्या करिअरसाठी उपयुक्त व्हावे यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे नेहमीच प्रयत्न करत असतात. त्याचाच एक भाग म्हणून अन्न व औषध प्रशासन कार्यशाळा छ. संभाजीनगर अन्न व औषध प्रशासन बीड आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालय बीड यांच्याद्वारे अन्नपदार्थ मधील भेसळ कशी ओळखायची यांची जनजागृती मोहीम आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे आयोजन आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून छत्रपती संभाजी नगरचे सतीश बादाडे, बीडचे पवन कुमार धूत, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शाम भुतडा तर व्यासपीठावर डॉ. कल्याण अपेट, डॉ. पी. डी. खेडकर, डॉ. डी. बी. सातपुते, डॉ. एन. यु. ठोके, प्रा. पी.आर. गव्हाणे,प्रा. व्ही. एस. मिसाळ, प्रा. के.पी. पवार, प्रा. ए.पी. धुमाळ, प्रा. एस. आर. सुधीर, प्रा. पी. एस. मोराळे यांची उपस्थिती होती. प्राचार्य शाम भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याण अपेट यांनी केले. दैनंदिन वापरातील अन्न पदार्थांमध्ये विविध घटकांचा वापर करून भेसळ केली जाते. भेसळ करण्यासाठी अपायकारक पदार्थांचा वापर केला जातो. त्यामुळे अन्नपदार्थांचा दर्जा खालावतो. भेसळ करण्यासाठी सामान्यतः खडू भुकटी, कृत्रिम रंग, लहान-मोठे दगड, लाकडाचा भुस्सा इत्यादी घटकांचा वापर केला जातो. असे भेसळयुक्त पदार्थ खाण्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. त्यामुळे अन्न पदार्थांतील भेसळ ओळखणे अत्यंत आवश्यक असल्याचे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेले छत्रपती संभाजीनगरचे सतीश बादाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. यावेळी त्यांनी भेसळ ओळखण्याच्या पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

# चर्चमध्ये गोंधळ घातल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरातील क्राईस्ट चर्चच्या विभागीय विश्‍वस्तांची मनमानी वाढली असल्याचा आरोप स्थानिक मंडळाच्या सदस्यांनी केला आहे. दरम्यान, काही समाजकंटकांनी चर्चमधील धार्मिक कार्यात अडथळा आणल्याच्या कारणावरुन सदर बाजार पोलीस ठाण्यात ४ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यासंदर्भात विश्‍वस्त सौ. अश्‍विनी संदिप रेड्डी यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, आपण गुडफ्रायडेच्या निमित्ताने १८ एप्रिल रोजी भक्ती व उपासनेसाठी क्राईस्ट चर्चमध्ये हजर असताना रेव्ह उपेंद्र भास्कर म्हंकाळे, रेव्ह मोजेस दौलत जाधव, प्रभुदास सोबनसिंग ठाकूर, चंद्रसेन निर्मळ, नंदा जाधव, अनिता हिरे, द्वारकाबाई लोंढे यांच्यासह इतर १५ ते २० जण अचानक चर्चमध्ये वेदीजवळ आले आणि आमचे महाधर्मगुरु रेव्ह अश्‍विन शेळके यांचे भाषण थांबवून त्यांच्यासह सुत्रसंचालन करणारे राजेश नरेंद्र निर्मळ यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. तसेच या सर्वांनी चर्चमध्ये गोंधळ घालून धार्मिक कार्यात अडथळा निर्माण करीत उपस्थित समाजबांधवांच्या भावना दुखावल्या आहेत, असे नमूद करून सौ. रेड्डी यांनी पुढे म्हटले आहे की, याप्रसंगी याप्रसंगी हरिश कांबळे, जोसेफ जगधने, संजय पाखरे, रोबेन नवगिरे, कांता जगधने, प्रिती जगधने यांनी पोलिसांच्या मदतीने महाधर्मगुरु आणि पाहुण्यांना सुरक्षित बाहेर काढले. यावेळी वरिल समाजकंटकांनी पुन्हा धक्काबुक्की केली. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात रेव्ह उपेंद्र भास्कर जाधव म्हंकाळे, रेव्ह मोजेस दौलत जाधव, प्रभुदास सोबनसिंग ठाकुर आणि चंद्रसेन निर्मळ, नंदा जाधव, अनिता हिरे, द्वारकबाई लोंढे यांच्यासह इतर १५ ते २० जणांविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १८९ (२), ११५ (२), २९८ आणि ३५२ याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# मिराबाई राऊत यांचं अल्पसा आजाराने निधन

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड येथील श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स चे संचालक कैलास राऊत यांची आई मिराबाई कृष्णा राऊत वय ६५ वर्षे यांचे आज दि १९ एप्रिल रोजी अल्पसा आजाराने निधन झाले असून त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमी इथे अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी शहरातील व्यापारी वकील पत्रकार शिक्षक मित्रपरिवार होता. कैलास राऊत, बाळासाहेब राऊत, दीपक राऊत, असे तीन भाऊ एक बहीण असा त्यांचा परिवार आहे.

# देशी दारूच गोडाऊन फोडून सहा लाखाची दारू लंपास

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड शहागड रोडवरील अंबड जवळील डावरगाव फाट्याजवळ अत्तलेल्या देशी दारुच्या होलसेल विक्रीच्या गोडाऊन फोडून अज्ञात चोरट्यांनी सहा लाखाची देशी दारू चोरून नेली. याप्रकरणी सीसीटीव्ही खराब असल्यामुळे व सीसीटीव्हीमध्ये १३ जानेवारी पर्यंतच दिसत आहे असल्याचे समजते यामुळे पोलिसांना तपास करण्यासाठी मोठी कसरत करावे लागणार आहे. असे पण पोलीस प्रशासनाकडून बोलल्या जात आहे. कॅमेरे सुरळी सुरू असली असते तर आरोपीचा शोध लवकरच लागला असता असे म्हणाला हरकत नाही. ६ लाख ५ हजार २२० रुपये किमतीचे देशी दारु लंपास केले.**



याप्रकरणी या गोडाउनचे संचालक शिवाजी बजाज यांनी अंबड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, हावरगाव शिवारात सर्वे नं. ११९ मध्ये बजाज ट्रेडर्स या देशी दारुच्या दुकानाचे होलसेल विक्रीचे गोडाऊन असून, आम्ही दररोज सकाळी दुकान उघडून दुपारी १ वाजेच्या सुमारास गोदाम मध्ये माल भरुन दुकान बंद करत असतो. आपण गोडाऊन उघडून दुपारी १ वाजेच्या सुमारास गोडाऊनचे शटर बंद करून कुलुप लावुन घरी गेलो. गोडाऊनवर कामाला असलेला सोमनाथ काशिनाथ शिनगारे याने रात्री ८ वाजेच्या सुमारास गोडाऊन चेक केले असता गोडाऊनचे शटर व कुलूप व्यवस्थित लावलेले दिसुन आल्याने तो घरी निघुन गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ९ वाजेच्या सुमारास सोमनाथ शिंगारे हा गोडाऊनवर कामाला आला असता दुकानाचे शटर उघडे दिसले. त्याने लगेच गोडाऊनचे मॅनेजर दिपक काळे यांना फोन करुन सर्व घटनेची माहिती सांगितली असता श्री. काळे यांनी मला फोनद्वारे सर्व प्रकार सांगितल्याने मी लगेच डावरगाव येथील गोडाऊनवर जावून पाहिले असता शटर उघडे दिसले. त्यानंतर सदर घटना अंबड पोलिसांना कळवली असता पोलिसांनी गोडाऊनची पाहणी केल्यानंतर दारुचे बॉक्स खाली जमिनीवर पडलेले दिसले व काही बाटल्या फुटलेल्या दिसल्या. दारुचे थप्पी लावुन ठेवलेले बॉक्स दिसुन आले नाहीत. असे एकुण ६ लाख ५ हजार २२० रुपये किमतीचे १८० बॉक्स चोरीला गेल्याचे पाहणीत निष्पन्न झाले असून, याप्रकरणी शिवाजी शामलाल बजाज यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोलीस करीत आहे.

## पान १ वरून...

### मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला

प्रत्येक भाविकांचा विकास झाला पाहिजे. पंकजाताई चे हे विधान लक्षात घेता आमच्या बीड जिल्ह्याचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. आमचा हा बीड जिल्हा जो सातत्याने दुष्काळाच्या छायेत असतो त्याला दुष्काळातून बाहेर काढले पाहिजे. म्हणून आम्ही त्याप्रमाणे प्रयत्न सुरू केला आहे. आपले जे हक्काचे कृष्णेचे पाणी होते ते पाणी आपण आष्टीमध्ये आणण्याचा निर्णय केला. आजचे पाणी आष्टी पर्यंत पोहोचत आहे. केवळ पर्यंत पाणी आष्टी तालुक्यापर्यंत पोहोच करून आपल्याला चालणार नाही तर संपूर्ण बीड जिल्हा पाणीदार करावा आहे आणि तोच आमचा प्रण आहे. घाटशिळ पारगावकरांनी कुकडीतून पाण्याची मागणी केली त्याचा विचार केला तर खरं म्हणजे आमची परिस्थिती अशी आहे गावाच्या एकाच हौदामध्ये पाणी आहे आणि प्रत्येकाला त्याच हौदातून पाणी हव आहे अशी स्तिथी दिसते. पाणी वाढत नाही पण पाणी मागणारे वाढत आहेत. यामुळे आमच्या पुढे एक मोठं संकट निर्माण झाले. परंतु साधू -संतांच्या आशिर्वादाने या मराठवाड्याला कायम दुष्काळ मुक्त करण्याकरिता समुद्रात वाहून जाणार ५३ टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्यासाठी आम्ही मान्यता दिलेली असून आता त्याचे आराखडे तयार होत आहेत.आणि आमचा आता प्रयत्न आहे या वर्षाच्या शेवटी किंवा पुढच्या वर्षी हे काम आम्ही सुरू करणार आहोत. यामधून मराठवाड्याला कायमचे दुष्काळ मुक्त करणार आहोत. २१ टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळायला हवं होतं आम्ही ज्यावेळी निर्णय केला त्यावेळी लक्षात आले केवळ ७ टीएमसी पाणी असून उर्वरित पाणी पळवले गेले आहे. परंतु काळजी करण्याचे कारण नाही जो कृष्णा-कोयणेलापूर येतो त्या पुराचे पाणी आम्ही वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून, वळण बंधाऱ्याच्या माध्यमातून या परिसरामध्ये आणण्याच्या योजनेला मान्यता दिलेली आहे. मे महिन्यामध्ये त्याचे टेंडर देखील काढत आहोत. या योजनेतून संपूर्ण मराठवाड्याला पाणी देत आहोत. पश्चिम महाराष्ट्राशीलगत एकीकडे नगर जिल्हा तर दुसरीकडे सोलापूर कडून उजनी धरणातून मराठवाड्यात आणत आहोत. सुमारे ३० टीएमसी पाणी वळण बंधाऱ्याच्या माध्यमातून मराठवाड्याला मिळत आहे. कुकडीच्या पाण्यावरती ऑल रेडी ट्रेस आहे याच पाणी त्याला त्याचे पाणी याला न करता तुमच्या हक्काचं पाणी हे तुमच्यापर्यंत पोहोच करण्याचे काम आपले सरकार करून दाखवेल असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठवाड्यातल्या या पिढीने दुष्काळ पाहिला पण मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही, असे अभिवचन देत केवळ सप्ताहातील भाविक भक्तांचा नव्हे तर बीड जिल्ह्यातील जनतेचा उत्साह घाटशीळ पारगाव येथील व्यासपीठावरून वाढवला आहे. यावेळी व्यासपीठावरती ह.भ.प. महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्यासह जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे, आ. सुरेश धस, माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, आ. मोनिका राजळे, आ. नमिता मुंदडा, माजी आ.भीमराव धोंडे, प्रताप ढाकणे, माजी आ. बाळासाहेब मुरकुटे, लक्ष्मण हाके, विभागीय आयुक्त गावडे, वप्स बोर्डाचे अध्यक्ष समीर भाई काजी, भाजप ज्येष्ठ नेते रामराव खेडकर, बाबुराव केदार, प्रकाश खेडकर, माजी सरपंच वैजनाथ खेडकर, सरपंच नवनाथ खेडकर आदींची उपस्थिती होती.

-------------

### शेट्टी-कडू-जानकर तीन

शेवते यांनी सदर परिषदेविषयी पत्रकार परिषदेत माहिती दिली. पक्षाचे अध्यक्ष जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त ही परिषद आयोजित केली आहे. युवा अवस्थेत जानकर यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयामुळे राज्यात एक नवी चळवळ उभी राहिली. तसेच हे तीनही नेते सर्वसामान्य कुटुंबातील असून, ते परिषदेत युवकांना संदेश देतील. दरम्यान, विधानसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्रात महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले तर दुसरीकडे महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. सध्या विधानसभेमध्ये महाविकास आघाडीकडून कोणत्याही पक्षाला विरोधी पक्षनेतेपद देखील देण्यात आलेले नाही. त्यामुळे कुठेतरी विरोधकांची ताकद कमी झाल्याचे बोलले जात असतानाच विरोधकांची कमी झालेली स्पेस घेण्यासाठी महाराष्ट्रातील तीन मातब्बर नेते एकत्रित येणार आहेत. राज्याच्या राजकारणामध्ये महायुती, महाविकास आघाडीनंतर वंचित बहुजन आघाडीचा प्रयोग महाराष्ट्रातील राजकारणात पाहायला मिळाला.

---------------

### महाराष्ट्राच्या हिताआड येणाऱ्यांच्या

शिवसेना उबाठाच्या कामगार सेनेच्यावतीने दादरच्या शिवाजी मंदिरात आयोजित कार्यक्रमात उद्धव ठाकरे बोलत होते. उद्धव ठाकरे म्हणाले, तसे बघायला गेले तर माझ्याकडून कोणतेच वाद किंवा भांडणे नाहीत, जर असतील ते इथेच मिटवले असे जाहिर करत महाराष्ट्राच्या हिताच्या आड येणाऱ्यांना घरी बोलावणार नाही की मी त्यांच्या घरी जाणार नाही, अशांचे आगत- स्वागत करणार नाही, अशांच्या पंक्तीलाही बसणार नाही असे जर असेल तरच मी ज्यांची शिवसेनेसोबत अर्थात एसंशी (एकनाथ संभाजी शिंदे) नव्हे महाराष्ट्रासाठी एकत्र येण्याची इच्छा असेल अशा सर्वांना सोबत घेऊन चालण्याची आमचीही इच्छा आहे. मी यापूर्वीच सांगत होतो की, महाराष्ट्राच्या अस्मितेवर फौज चालून येत आहे. महाराष्ट्रात येऊ घातलेले प्रकल्प गुजरातला पळवून नेले जात आहेत, इथल्या मराठी भाषेवर महाराष्ट्राचे मीठ खाणाऱ्यांकडून मध्यंतरी कोण ते जोशी की वाशी येथे आले होते, ते म्हणत होते की, घाटकोपरची भाषा अमूक आहे, तमूक आहे म्हणून त्यांनीच जाहिर केलेल्या घाटकोपरमध्ये हिंदी भाषा सक्तीची करा असे आव्हान भाजपाचे नाव न घेता देत लोकसभा विधानसभा निवडणूकीत आपण एकत्र येण्याचे आवाहन करत होतो, त्यावेळी दिल्लीत आपल्या विचाराचे सरकार बसविले असते तर महाराष्ट्रातही आपले सरकार बसले असते. पण काही जणांना ते त्यावेळी मान्य नव्हते अशी उपरोधिक टीका मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे नाव न घेता त्यांनी केली. त्या लोकसभा विधानसभा निवडणूकीच्या काळात हे जे हिताच्या बाजूने आज बोलत होते, त्यावेळी कधी त्यांना पाठिंबा देत होते, तर कधी त्यांना समर्थन देत होते आणि परत जमले नाही म्हणून त्यांच्या विरोधात भूमिका घेत विरोध करत आहेत, असे चालणार नाही, त्यामुळे माझ्याही काही अटी असून महाराष्ट्राच्या हिताच्या आड येणाऱ्यांशी मैत्री कधी नको, त्यांचे आगत-स्वागत नको, की त्यांच्या पंगतीला बसणे नको असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

---------

### स्व.बाबासाहेब आगे यांच्या

भेटणार होत्या परंतू अचानक मिटिंगसाठी मुंबईला जावे लागल्याने त्यांच्या सूचनेनुसार भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यां समवेत आगे परिवाराची त्यांच्या घरी जावून भेट घेतली व ना. पंकजाताईंनी दिलेली मदत सुपूर्द केली. यावेळी ना. पंकजाताईंनी दूरध्वनीवरून आगे यांचे आई वडील तसेच पत्नी व लहान मुलीशी संवाद साधत त्यांना धीर दिला व सांत्वन केले. पत्नीला नोकरी देण्याचा शब्द देत तुमच्या काळजी करू नका, मी तुमच्या पाठिशी सदैव राहील असा धीर त्यांनी यावेळी दिला. ना. पंकजाताईंनी दिलेल्या या मायेच्या आधाराने आगे परिवाराला अश्रू अनावर झाले होते. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, तालुकाध्यक्ष अरूण राऊत, नवनाथ शिराळे, रामराव खेडकर, रामदास बडे, डॉ. अशोक तिडके, प्रकाश सुरवसे, श्रीकांत सानप आदींसह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

--------------

### रणजित कासले विरोधात परळी

मला दहा लाख रुपये देण्यात आले, असे चुकीचे आरोप करत लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी, राज्य सरकार यावर शंका निर्माण होऊन कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण व्हावा त्याचबरोबर निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह व बदनामी तसेच सह देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने शंका उपस्थित करणारे वक्तव्य स्वतः लोकसेवक असताना कासले याने केले असून, त्या विरुद्ध नायब तहसीलदार निवडणूक श्री अण्णा वंजारे यांच्या फिर्यादीनुसार परळी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १७५, ३३६ (४), ३५३ (१- ब), १९८, ३५६ (२), तसेच १९७ (१- ड) या अंतर्गत गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास परळी शहर पोलिस करत आहेत. दरम्यान रणजित कासले याने अटक होण्यापूर्वी निवडणूक आयोगाला आव्हान देणारे काही बेजबाबदार वक्तव्ये केली होती, त्यावरून आयोगाने बीड जिल्हा प्रशासनाकडून याबाबतचा अहवाल मागवला असल्याचे समजते. बीड जिल्हा प्रशासनाने निवडणूक आयोगास रणजित कासले याने केलेल्या वक्तव्याबाबत गुप्त अहवाल सादर केला असून, रणजित कासले याला निवडणुकीत काळात बीड सायबर विभागात नेमणूक दिलेली होती, त्याची ड्युटी परळी विधानसभा मतदारसंघात नव्हती त्यामुळे त्याचा निवडणूक प्रक्रियेत काहीही संबंध नव्हता, असा अहवाल सादर केला असल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार समजले आहे. तर दुसरीकडे रणजित कासले ज्या दहा लाख रुपयांची गोष्ट सांगत हे सगळे आरोप करत होता, ते दहा लाख रुपये अंबाजोगाई येथील संत बाळूमामा कन्स्ट्रक्शन चे संचालक सुदर्शन काळे यांच्या कडून कासले याने मागून घेतले होते तसेच त्यातून साडे सात लाख रुपये आतापर्यंत काळे यांना परत दिले असून आणखी उरलेले अडीच लाख रुपये परत द्यावेत यासाठी सुदर्शन काळे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे स्वतःच नशेत वक्तव्ये करतो असे विधान करणाऱ्या रणजित कासले याने केलेली वक्तव्ये निराधार खोटी आणि केवळ सनसनाटी निर्माण करायच्या उद्देशाने केलेले होते हे आता स्पष्ट झाले आहे.

--------------

### तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी डॉ. सुश्रुत

रुग्णालयाचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. ससूनच्या अहवालामध्ये डॉ. घैसास यांनी निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यावरुन आता त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तनिषा भिसे यांना चार तास ताटकळत ठेऊन त्यांच्यावर उपचार केला नाही. त्यामुळे पुढची परिस्थिती उद्धवल्याचे या अहवालात म्हटले आहे. डॉ. घैसास यांनी या प्रकरणी निष्काळजीपणा दाखवल्याचे या अहवालात म्हटले आहे. डॉक्टर सुश्रुत घैसास यांचेवर पोलिस योग्य ती कारवाई करतील असे पुणे पोलिस उपायुक्त संभाजी कदम म्हणाले. या प्रकरणात डॉ. घैसास यांची भूमिका निष्पण झाली आहे. त्या आधारे हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिस उपायुक्तांनी सांगितले. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डिपॉझिटअभावी गरोदर महिलेला उपचार नाकारण्यात आले होते. त्यामुळे या महिलेचा मृत्यू झाला होता. यानंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाविरोधात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर या प्रकरणाचा तपास करण्यासाठी ससूनच्या डॉक्टरांची एक समिती नेमण्यात आली होती.

----------

### बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट

चक्रवर्ती म्हणाले, आम्हाला राज्यात दंगे नको आहेत. बंगालमध्ये चांगली स्थिती नाही. दंगल प्रभावीत क्षेत्रातील हिंदुंना आपली घरे सोडावी लागत आहेत. बंगालमध्ये तुष्टीकरणाचे राजकारण सुरू आहे. बंगाल आपल्या हातातून निसटत चालला आहे.

----------

### पीकविम्याचे सतराशे कोटी आठवडाभरात

कंपन्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करतात. तर दुसरा हप्ता मिळाल्यानंतर काढणीपश्चात नुकसान आणि पीक कापणी प्रयोग आधारित नुकसान भरपाई जमा करण्याची तरतूद आहे. राज्याने आपल्या हिस्स्याचा पहिला हप्ता विमा कंपन्यांना दिला. त्यामुळे विमा कंपन्या आता स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून मिळणारी भरपाई शेतकऱ्यांना देत आहेत. भरपाई जमा करण्याची प्रक्रिया अत्यंत संथ आहे. रब्बी हंगाम संपला असताना खरिपातील भरपाई निश्चित करण्याचे काम सरु आहे. १७ एप्रिलपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून ३ हजार १७५ कोटी रुपयांची भरपाई निश्चित झाली. पुढील काळात यात आणखी वाढ होऊ शकते, असेही कृषी विभागाने सांगितले. १७ एप्रिलपर्यंत निश्चित झालेल्या ३ हजार १७५ कोटी रुपयांपैकी आतापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात १ हजार ४७३ कोटी रुपये जमा झाले. तर उरलेले १ हजार ७०२ कोटी रुपये लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले. काढणी पश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई निश्चित करण्याचे काम सुरु आहे. ही भरपाई लवकरच निश्चित होईल. तसेच राज्य सरकारने आपल्या हिस्स्याचा विमा हप्ता कंपन्यांना दिल्यानंतर विमा कंपन्या शेतकऱ्यांच्या खात्यात या दोन ट्रीगरमधून निश्चित झालेली भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करतील, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....



## गेवराईतील आगरनांदुर येथून बैलजोडी चोरीला

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील आगर नांदूर येथे शेतातून बैलजोडी चोरल्याची भलतीच घटना शुक्रवारी सकाळी समोर आली आहे. बालाप्रसाद किसनलाल सोमानी या शेतकऱ्याच्या गट क्रमांक २६३ मधील शेतामध्ये बांधलेली जवळपास १ लाख रुपये किंमतीची बैलजोडी चोरांनी पळवून नेली आहे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेवराई तालुक्यातील आगर नांदूर शिवारात बालाप्रसाद किसनलाल सोमानी यांची गट नं.२६३ मध्ये शेती आहे. या शेतातील गोठ्यात बांधलेली बैलजोडी चोरीला गेल्यास परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान बालाप्रसाद सोमाणी यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आगर नांदूर येथे मी माझे कुंटुबासह राहतो. मी शेतीचा व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवितो माझ्याकडे आगार नांदूर शिवारात गट.नं. २६३ मध्ये आठ एकर शेती आहे. शेतीच्या मशागतीसाठी माझ्याकडे बैलजोडी आहे. त्यासाठी गट. नं. २६३ मध्ये गोटा बांधलेला आहे. दि. १७/०४/२०२५ रोजी सांयकाळी सात वाजण्याच्या सुमारास मी माझे शेतातील गट नं २६३ मध्ये असलेल्या गोठ्यावरून जनावरांना चारापाणी करून घरी आलो. दि.१८/०४/२०२५ रोजी सकाळी ७ वाजता शेतात गोठ्यावर जनावरांना चारापाणी करण्यासाठी गेलो असता गोठ्यामध्ये बैलजोडी दिसून आली नाही. त्यामुळे मी आजूबाजूला व इतर ठिकाणी बैलांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. दोन पांढऱ्या रंगाचे खिलार जातीचे उभे अर्धवट गोलाकार शिंगे असलेले बैल, असे चोरीला गेलेल्या बैलाचे वर्णन असल्याचे सोमानी यांनी फिर्यादीत म्हटले आहे. तरी हे दोन्ही बैल शेतातील गोठ्यातून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेले आहेत. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गेवराई पोलिस करत आहेत.

# आजच्या राष्ट्रीय व राज्य नेतृत्वाच्या कार्याला एकात्म मानवदर्शन विचारांचे पाठबळ -मंगल प्रभात लोढा

**मुंबई । प्रतिनिधी**

**एप्रिल १९६५ मध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी प्रथमच रुईया महाविद्यालयात 'एकात्म मानवदर्शन' आणि 'अंत्योदय' या विचारांची मांडणी केली. जी भारताच्या प्रगतीचा आत्मा, संस्कृती आणि शाश्वततेची दिशा देणारी होती. त्याच ऐतिहासिक स्थळी, त्याच दिवशी, साठ वर्षांनी, २२ ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान 'पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सव' साजरा होणार आहे, अशी माहिती कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

या कार्यक्रमाचे उदघाटन मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीसजी यांच्या हस्ते होणार असून,तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन जी, केंद्रीय मंत्री मा. पियुष गोयल जी यांच्यासह कृष्ण गोपाल जी, मनमोहन वैद्य जी, सुनील आंबेकर जी, बि. एल संतोष जी आणि सुरेश सोनी जी यांसारखे ज्येष्ठ वक्ते लाभणार आहेत. ''पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय राजकारणात एक अद्वितीय वैचारिक प्रवाह



आणला. 'एकात्म मानव दर्शन', अंत्योदय या सारख्या संकल्पना मांडून त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न केला. आज पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्र मोदी जी, गृहमंत्री माननीय श्री अमित शाहजी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीसजी या सर्वांच्या कार्यात एकात्म मानवदर्शनचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. आज देशपातळीवर आणि महाराष्ट्रात राबवल्या जाणाऱ्या सर्वच योजनांमधून पंडित दीनदयाळजींची मूल्ये झळकतात. अन्न, वस्त्र, निवारा या गरजांची पूर्तता, शिक्षण, नागरिकांचे संरक्षण या सर्वच गोष्टी आज समाजातील शेवटच्या व्यक्तीला मिळाव्यात यासाठी आमचे सरकार कार्यरत आहे. पंडितजींच्या विचारांनी केवळ तात्त्विक भूमिका मांडल्या नाहीत, तर सामान्य माणसाच्या उन्नतीसाठी कृतीचा मार्ग दाखवला. आज त्या विचारांची नव्याने उजळणी करताना, आपल्या कृतीत त्याचे प्रतिबिंब उमटले पाहिजे हाच सदर महोत्सव करण्याचा आमचा उद्देश आहे, असे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले. या महोत्सवात भू सांस्कृतिक राष्ट्रवाद, भारत का स्व, लोकमत परिष्कार, भारताची विकासाची व्याख्या, पंडित दीनदयाळजींचे आर्थिक चिंतन या सारखे विषय श्रोत्यांना ऐकायला मिळणार आहेत. पंडितजींचे विचार जास्तीस्त जास्त लोकांनी ऐकण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन यावेळी कॅबिनेट मंत्री प्रभात लोढा यांनी केले. सदर कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी . या संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे. महोत्सवाचे आयोजन पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सव समितीच्या माध्यमातून होणार असून, सहयोगी संस्था म्हणून लोढा फाउंडेशन आणि दीनदयाल शोध संस्थान कार्यरत आहेत. पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हिरक महोत्सव समितीच्या अध्यक्षस्थानी कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा असून, त्यांनीच या महोत्सवाला राज्यव्यापी स्वरूप देण्यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव केवळ स्मरणरूपात न ठेवता, पंडितजींच्या विचारांवर आधारित समाज हिताचे उपक्रम राज्यभर राबवले जात आहेत.

## भाजपामध्ये आज होणार मोठे संघटणात्मक बदल, जिल्ह्यातील १९ नवीन शिलेदारांची निवड

**जालना । प्रतिनिधी**

आज २० रोजी एकाच दिवशी महाराष्ट्रातील ११९६ मंडळ अध्यक्षाची निवड होणार आहे. गेल्या १ जानेवारी २०२५ पासून महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टीचे संघठण पर्व अर्थात नवीन सदस्यता अभियान सुरु झालेले असून त्या अंतर्गत महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टीचे विक्रमी १.५० कोटी प्राथमिक सदस्य पुर्ण झाले असून १ लाख ३४ हजार सक्रिय सदस्य पुर्ण झाले आहेत. याच जोडीला जालना जिल्हयात ३ लाख प्राथमिक सदस्य व सक्रिय सदस्य ४२०० पुर्ण झाले आहेत. व जिल्हयातील १७५५ बुथ पैकी १४०० बुथ गठीत झाले असून एका बुथवरील १२ जणांची समिती देखील गठीत झाली आहे. संघठण पर्वातील महत्वाचा टप्पा असा आहे की, पुर्वी भारतीय जनता पार्टीचे जालना जिल्हयात संघठणात्मक ९ मंडळ होते परंतु आता भारतीय जनता पार्टीने कामाच्या सोयीनुसार जालना जिल्हयात १० मंडळाची वाढ होऊन ती आता जालना जिल्हयात १९ मंडळाची रचना केली आहे. त्यासर्व मंडळातून मंडळ अध्यक्ष पदासाठी प्रत्येक मंडळातून तीन व तिन पैक्षा जास्त इच्छुकांची चाचपणी पुर्ण करुन जिल्हयातील नेतृत्वाच्या शिफारशीनुसार प्रदेशाध्यक्ष यांच्या सोबत १६ एप्रील रोजी चर्चा करुन दिनांक २० एप्रील २०२५ रोजी जिल्हयाच्या सर्व १९ मंडळ ठिकाणी अध्यक्ष पदाची घोषणा होणार आहे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,आ.नारायण कुचे-अंबड,आ.बबनराव लोणीकर-परतुर, राहुल लोणीकर-मंठा,जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे-घनसावंगी, जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे,राजेश राऊत,सतिष जाधव,विजय कामड-जालना महानगर व ग्रामीण या प्रमाणे मान्यवर मंडळ अध्यक्ष पद घोषणा करण्यासाठी जाणार आहेत.

पान ६ वरून...

### जल व्यवस्थापनसाठी

यावेळी लालासाहेब वीर म्हणाले,पाण्याविषयी बचत पाण्याविषयी चे महत्व पाणी हे एक जीवन आहे.पाणी भविष्यासाठी किती आवश्यक आहे या बाबीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक स्नेहल भोसले ह्या म्हणाल्या,शेतीला आधुनिक पद्धतीने पाणी देण्यासाठी तुषार सिंचन ठिबक सिंचन या पद्धतीचा वापर करावा आणि जास्तीत जास्त पाणी बचत करावी असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबन झगडे यांनी तर रघुनाथ शिंदे यांनी मानले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### बुलढाणा अर्बन बँकेचे अध्यक्ष

महत्त्व आहे गायीची केलेली सेवा कधीही वाया जाणार नाही अशी त्यांनी भावना व्यक्त केली .आज बीड येथील बुलढाणा अर्बन बँकेचे माननीय संजय नानासाहेब देशमुख विभागीय व्यवस्थापक व बीडची शाखा व्यवस्थापक सतीशजी जाधव व त्यांचे कर्मचारीवृंद व गोसेवक गौतम खटोड उपस्थित होते . अध्यक्ष विजयराज बंब यांच्याकडे गोशाळेमध्ये सर्वांनी मिळून पेंड सुपूर्द केली व आज पहिल्या दिवशी १५० किलो पेंड तेथे असलेल्या गाईंना गोग्रास देण्यात आला.

### जामखेड सौताडा राष्ट्रीय

शामीर सय्यद, शिवसेना शहरप्रमुख गणेश काळे, कृष्णा गाडे, अजित रेडे, यांचा राष्ट्रवादी पक्षात प्रवेश झाला.यावेळी बोलताना तालुकाध्यक्ष महेश निमोणकर म्हणाले की, अजित दादा शब्दाला जागणारे नेते आहेत. आज जामखेड पवित्र झाले आहे. मतदारसंघासाठी कुकडीचे पाणी, एमआयडीसी, पाणीपुरवठा योजना याबाबत लक्ष घालावे व कर्जत जामखेड साठी आशिर्वाद हवा असे निमोणकर यांनी सांगितले. यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की,रोहित माझ्यासोबत असताना मी किती कोटींचा निधी दिला याची माहिती घ्या काम करताना उन्हे धुणे काढू नका आपापले काम करा, जनताच आपल्या कामाचे मूल्यमापन करत असते. माझ्या समोर सर्व कार्यकर्ते समान आहेत. मी कधीही भेदभाव करत नाही. मी नेहमीच बेरजेचे राजकारण करतो वजाबाकी चे नाही यावेळी त्यांनी भारतीय हवामान खात्याचा समाचार घेतला पाश्चात्य देश व भारत तुलना केली. पाश्चात्य देशात हवामान खात्याने सांगितले की त्या वेळी पाऊस येतोच भारतात मात्र उलटे होते.

### अनिलदादा जगताप यांच्या

उबाळे, दामोदर डोळस, किशोर जाधव, भरत जाधव, सुमित जाधव, वसंत जाधव, प्रशांत दुधाळ, प्रितम दुधाळ, दिपक भराटे, महेश नेवडे, गोपाळ आखाडे, सुशील दुधाळ, औदुंबर दुधाळ, नितिन शेवाळे, दत्ता राऊत, विनोद गायकवाड, रवि दुधाळ, अविनाश कुऱ्हाडे, सोहेल गायकवाड, विनोद गायकवाड, तेजस नाळे, सोनू सुरवसे, अविष्कार दुधाळ, अनय गायकवाड, राम अंकुशे, सचिन अंकुशे, श्याम अंकुशे, प्रतिक दुधाळ, निवास रोकडे, संघर्ष डोंगरे, सौरभ राऊत, बबलू घुमरे, अतुल जगताप, शैलेश आगलावे, दीपक बोबडे यांनी काल दि. १९ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोडबीड येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांनी प्रत्येकाच्या हाती भगवा झेंडा देऊन सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यशस्वीपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे. सर्वसामान्यांसाठी त्यांनी अनेक हितदायी योजना उभारल्या. बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असणारे आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांची ताकद वाढवण्याकरिता आपण सर्व जाती-धर्मातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे अशा भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात मांडल्या तर अठरा पगड जातीची वज्रमुठ एकनाजी शिंदे साहेबांची ताकद वाढविण्यासाठी कामी येणार असल्याचे मत शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाई भाजपला नव्या तालुकाध्यक्षाचे वेध

## तोंडाला फडकं आणि बड्या बड्या बाता मारणाऱ्यांना पदे नको, जनतेत जाणाऱ्या लोकाभिमुख नेतृत्वाला संधी द्यावी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्याला आता नव्या भाजपा अध्यक्षाचे वेध लागले आहे कारण विद्यमान तालुकाध्यक्षांची मुदत संपलेली आहे. पक्षीय पातळीवरसुध्दा हालचालींनी वेध घेतला आहे. अंबाजोगाई भाजपा तालुकाध्यक्षाची निवड येत्या काही दिवसात पक्ष नेतृत्व करेल परंतु पक्ष नेतृत्वाने अंबाजोगाई तालुक्यावर भाजप तालुकाध्यक्ष लादू नये ही माफक अपेक्षा सामान्य कार्यकर्त्यांची असणार आहे. भाजप तालुकाध्यक्ष निवडताना तो जनतेतला असावा आणि लोकाभिमुख असावा अशी अपेक्षा आहे. कारण आतापर्यंत अनेक तालुकाध्यक्ष पक्ष नेतृत्वाने लादलेले आहेत. काहीजण तोंडाला फडकं बांधून तालुकाभर फिरायचे तर काहीजण केवळ बड्या बड्या बाता मारुन पक्षनेतृत्वाच्या पुढे पुढे करण्यातच पक्षकार्य समजायचे त्यामुळे भाजप तालुकाध्यक्षांची निवड ही योग्य व्यक्तीची करावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अंबाजोगाई तालुका हा दोन





विधानसभा मतदार संघात विस्तारलेला आहे. ज्यामध्ये केज आणि परळी विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. दोन्ही मतदार संघामध्ये समतोल राखण्याचे काम तालुकाध्यक्षाला करावे लागते. आजपर्यंत अनेक तालुकाध्यक्ष अंबाजोगाई तालुक्याने पाहिले आणि अनुभवले परंतु यांचा अनुभव तसा आगळावेगळा राहिलेला आहे. तालुकाध्यक्ष खर्या अर्थाने लोकप्रतिनिधी आणि सामान्य माणूस यांच्यातील दुवा असतो तर लोकप्रतिनिधीवर पक्षाचा अंकुश असतो त्या प्रमाणे तालुकध्यक्षाचा साहजिकच अंकुश असतो आजपर्यंत अनेकांना भाजप तालुकाध्यक्ष केले त्यांच्या कामाची गोळाबेरीज पाहिली तर तालुक्यामध्ये अपेक्षित असा पक्ष विस्तार कधी झालाच नाही. केवळ पक्ष नेतृत्वाने दिलेला कार्यक्रम राबविणे आणि हाती पडेल ते घेवून पोबारा करणे एवढीच काय ती जबाबदारी दिसून आलेली आहे. सध्या देशात आणि राज्यात महायुतीचे व विशेषतः भाजपाचे सरकार आहे. सरकारच्या योजना असतील, पक्षाचे ध्येय धोरण असेल किंवा लोकप्रतिनिधीसाठी असलेली आचारसंहिता असेल ही राबविण्याचे काम प्रामुख्याने तालुकाध्यक्षांचे आहे. सध्या या निकषाचे विचार पक्ष नेतृत्वाने करणे गरजेचे आहे सर्वच कार्यकर्त्यांनी व पदाधिकार्यांनी पक्षनेतृत्वावर जबाबदारी देवून तुम्हीच तालुकाध्यक्ष निवड असे म्हणणे योग्य नाही सर्वानुमते आणि काम करणार्या तरुण नेतृत्वाला संधी देण्याची गरज आहे. आणि पक्ष नेतृत्वाला ते ज्ञात आहे की कोण काम करतो आणि कोण नाही त्यामुळे योग्य व्यक्तीला सन्मान देवून त्या ठिकाणी पक्ष विस्तारण्याचा विचार व्हायला हवा सध्या महायुतीमधील तीन्ही पक्षांना मोठे व्हायचे आहे, पुढे जायचे आहे. त्यामुळे भाजप नेतृत्वाने आपण कसे आव्वल राहु याचा विचार करण्याची गरज आहे. अंबाजोगाई तालुक्याचा अध्यक्ष हा आतापर्यंत ग्रामीण भागाचा करतात तसा इतिहास आहे परंतु त्यामध्ये काही बदल करण्याची गरज आहे. तालुकाध्यक्ष नेमताना काही निकष बाळगणे अपेक्षित आहे. शहरामध्ये सुद्धा असंख्य चांगले तरुण काम करतात ज्यांना तालुक्यामध्ये चांगला मान सन्मान आहे आणि जे शहरात राहतातत आणि ग्रामीण भागातील जनसामान्यांची कामे प्राधान्याने करतात अशांना सुद्धा काम करण्याची संधी द्यावी ते करत असताना त्याची पक्षनिष्ठा, त्याच्या पक्षासाठीचे योगदान आणि काम करण्याचा हातखंडा हेसुद्धा पाहणे गरजेचे आहे.

### संजय गंभीरे होवू शकतात अंबाजोगाई तालुकाध्यक्ष?

अंबाजोगाई तालुकाध्यक्ष पदासाठी संजय गंभीरे हा चेहरा योग्य असल्याची अनेकांची भावना आहे. तरुण नेतृत्व आहे,काम करण्याची उमेद आहे, झोकून देण्याची तयारी आहे. शिवाय पूर्णवेळ पक्षकार्यासाठी देवू शकतात म्हणून संजय गंभीरे यांच्या माध्यमातून भाजपाला चांगले नेतृत्व मिळेल कारण त्यांचा गेल्या दहा वर्षातील सामाजिक व राजकीय कार्याचा विचार केला तर नक्कीच अभिनंदनीय व कौतुकास्पद राहिलेला आहे. अंबाजोगाई नगरपालिका असेल किंवा बीड लोकसभा असेल, किंवा केज विधानसभा निवडणुक असेल यामध्ये त्यांनी आपल्या कार्याची चुणुक दाखविली आहे. संघटन कश्या पद्धतीने केले जाते हे विधानसभा निवडणुकीत दाखवून दिले आहे. त्यामुळे संजय गंभीरे या सारख्या कार्यकर्त्यांचा विचार केला तर नक्कीच भाजपाला या ठिकाणी चांगले दिवस यायला वेळ लागणार नाही.

# पोलीस, मनपा व व्यापाऱ्यांच्या प्रयत्नाने शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार!

**जालना । प्रतिनिधी**

**शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासन एकत्र येत ॲक्शन मोडमध्ये उतरले आहे. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, मनपा आयुक्त संतोष खांडेकर, जालना व्यापारी महासंघाचे सतीश पंच आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बसस्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मुख्य बाजारपेठांचा पायी फिरून सखोल आढावा घेण्यात आला.**

यावेळी झालेल्या बैठकीत वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाई, हातगाड्या-मुक्त रस्ते मोहीम, सम-विषम पार्किंग धोरण, नो पार्किंग झोनमध्ये कडक कारवाई यांचा समावेश असलेला कृती



आराखडा तयार करण्यात आला असून, येत्या १ मेपासून या निर्णयांची अंमलबजावणी सुरू होणार आहे. पथकात पोलीस निरीक्षक संदीप भारती, वाहतूक शाखा निरीक्षक जनार्दन शेवाळे, सहायक आयुक्त सुप्रिया चव्हाण, स्वच्छता प्रमुख पंडित पवार, शहर अभियंता सऊद सय्यद यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. निरीक्षण बसस्थानक, मामा चौक, सावरकर चौक, सिंधी बाजार, फुलबाजार आणि सराफा बाजार या भागांत करण्यात आले. रस्ते पाहणीनंतर काद्राबादमधील शिवा ट्रेडर्स आणि सराफा बाजारातील गिरधर लधानी यांच्या दुकानात अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत व्यापाऱ्यांची बैठक झाली. यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांच्या अध्यक्षतेखाली सराफा असोसिएशनचे महेश दुसाने, पुरुषोत्तम मोतीवाला, भरत गादिया, कापड असोसिएशनचे राजेश पंजाबी, किशोर टेकवाणी, सतीश अग्रवाल यांच्यासह अनेक व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला. बसस्थानक, मामा चौक, सिंधी बाजार, सराफा बाजार या भागांत मनपाच्या जागांवर सम-विषम पार्किंग व्यवस्था उभारली जाणार आहे. सराफा बाजारातील व्यापाऱ्यांनी जागा उपलब्ध करून दिल्यास १२ ते १२.५ मीटर रुंद रस्ता तयार करण्याची योजना असून, ही माहिती सतीश पंच यांनी दिली. हा कृती आराखडा शहरातील वाहतुकीचा गतिरोध कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात असून, प्रशासन आणि व्यापाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नातून शहरातील नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास श्री. पंच यांनी व्यक्त केला.



## डॉ.राऊत दाम्पत्यांचा सत्कार!!

केज : शहरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ दिनकर राऊत व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ हेमा राऊत यांचा केज तालुका संघर्ष माजी सैनिक संघटनेच्या वतीने विशेष सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. डॉ दिनकर राऊत व डॉ संध्या राऊत यांच्या दवाखान्यात माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियाना उपचार करताना विशेष काळजी घेऊन फिस व इतर तपासणी आणि उपचार शुल्कातही मोठी सूट व सवलत दिली जाते. सैनिक देशासाठी सीमेवर मोठे कार्य करतात अशा वेळी त्यांच्यासाठी आम्ही जराशी मदत केली तर त्यात आम्ही एवढे काय करतो असे डॉ हेमा राऊत म्हणतात. तर भविष्यात सैनिक व त्यांच्या परिवारासाठी आमचे हॉस्पिटल त्यांची जमेल ती सेवा करत राहणार असल्याचे डॉ दिनकर राऊत म्हणाले. डॉ दिनकर राऊत यांचा विशेष शोध निबंध आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रसिद्ध झाल्याबद्दलही सैनिकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी माजी सैनिक संघटनेचे केज तालुका अध्यक्ष अजिमोद्दीन शेख, सचिव हनुमंत भोसले, उपाध्यक्ष राम प्रभू राऊत, मस्के, नारायण शिंदे, अनिल सपाटे, शेख इलाही यांच्यासह इतर माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज येथे बसडेपोसाठी २२ एप्रिल रोजी केविसंसचे वतीने धरणे व उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

केज शहर खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या दोन प्रमुख महामार्गाच्या जोडणीवर असल्याने येथून दररोज हजारो प्रवासी महाराष्ट्राच्या कानाकोऱ्यात ये-जा करत असतात. किल्लेधारूर चे बसआगार केजसाठी सोयीचे नाही. तसेच येथून दूर पल्याच्या गाड्या केज येथून सुटणे गरजेचं आहे. यासाठीच केज येथे राज्यपरिवहन मंडळाचे बसआगार सुरू करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समिती गेली पंधरा वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. यासाठी समितीने सतत लेखी निवेदने व तोंडी विनंती करूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. यासाठी पुन्हा एकदा येत्या मंगळवार दि २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता केज तहसील कार्यालयासमोर धरणे व उपोषण आंदोलन सुरू करणार आहे. केज येथे बसआगारासाठी ७ एक्कर हुन अधिक जागा केज -बीड महामार्गालगत आरक्षित आहे. मात्र राज्यपरिवहन मंडळाच्या हलगर्जीपणा मुळे ही जागा सध्या पडून आहे. हळू हळू ही जागा आता अतिक्रमण धारकांच्या विळख्यात जाऊ शकते. यासाठी या जागेवर बसआगार स्थापित करावे तसेच आता इलेक्ट्रिक बसगाड्यांची वाढती संख्या पाहता याच जागेत अशा बसगाड्या इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटर सुरू करण्याची मागणी समितीने केली आहे. किमान आतातरी शासनाने वरिष्ठ पातळीवर केजच्या बसडेपो स्थापित करून येथे मोठे इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग सेंटर सुरू करावी अशी समितीने मागणी समितीने केली आहे. या आंदोलनात केजवासीयांची मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केले आहे. या निवेदनावर समन्वयक हनुमंत भोसले, शेषराव घोरपडे, नासेर मुंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक, आमदार नमिता ताई मुंदडा, उप महाव्यवस्थापक संभाजीनगर, विभागीय नियंत्रक बीड, आगार प्रमुख किल्लेधारूर यांना पाठवण्यात आलेल्या आहेत.

## जाहीर प्रगटन

मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात. किरकोळ दिवाणी अर्न ६५२/२०२५

महानंदा विरुध्द निरंक ॲड. पाखरे एस.आर.

अर्जदार :- १) महानंदा भ्र. फकीरा बहिरवाळ वयः ७८ वर्षे, धंदाः घरकाम रा. पिंपळवाडी ता.जि. बीड २) अरूण पि.फकीरा बहिरवाळ वयः ४६ वर्षे, धंदाः शेती रा.सदर ३) अंगद पि. फकीरा बहिरवाळ वय३५ः वर्षे, धंदाः शेती रा.सदर ४) रामकुअर भ्र.भगवान दहे वय ४९ वर्षे धंदा घरकाम रा. सदर ५) शारदा भ्र. कडुजी रहाटे वय ४२ वर्षे धंदा घरकाम रा. डोंगरगांव ता. शेनगांव जि.हिंगोली

विरुध्द निरंक

**मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र** (Heirship Certificate) **मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे फकीरा विठोबा बहिरवाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे फकीरा विठोबा बहिरवाळ रा. पिंपळवाडी ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : २२.१०.२०२४ रोजी राहते घरी मौजे पिंपळवाडी ता. जि. बीड येथे वृध्दपकाळाने झाला. अर्जदार क १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क २ व ३ हे मूले आहेत तर अर्जदार क ४ व ५ या विवाहीत मुली आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार व गैरअर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत फकीरा विठोबा बहिरवाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/०४/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक ११/०६/२०२५.

**क. लिपीक**

आदेशावरुन,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

जा.क्र.530/उपनि/बि-2/कलम101/जाहीर प्रगटन/2025 दिनांक - 15/04/2025

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 जाहीर प्रगटन

कार्यालय तालुका उपनिबंधक सहकारी संस्था बीड.

मिराई नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड या संस्थेने खालिल व्यक्तीस कर्ज वाटप केलेले आहे.सदर कर्ज थकीत असल्यामुळे त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करुन कर्जाची वसुली करण्यासाठी सदरहुन संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 अन्वये कार्यवाही करण्यासाठी वसुली प्रमाणपत्राच्या मागणीसाठी प्रकरण दाखल केले आहे.सदर कर्जदार व त्यांचे जामीनदार यांना कार्यालयाने प्रकरणाच्या सुनावणीसाठी पोष्टाने नोटीसा पाठवल्या आहेत.परंतु काही कर्जदार व जामीनदार दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने, गावी हजर नसल्याने किंवा घेण्यास इनकार असल्याने परत आल्या आहेत.तर काही प्रकारच्या नोटीसा तालीम झाल्याच्या पावत्या कार्यालयास मिळाल्या नाहीत करिता या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,सदर वसुली प्रमाणपत्र देण्यापुर्वि आपले म्हणणे मांडण्यासाठी उपनिबधक सहकारी संस्था तालुका बीड सहकार शक्ती इमारत, दुसरा मजला, जालना रोड, बीड येथे दिनांक 29/04/2025 रोजी वार मंगळवार सकाळी ठिक 11.00 वाजता प्रत्यक्ष अथवा विधीद्वारे उपस्थित राहावे. आपले लेखी अथवा तोंडी म्हणने उत्क दिवशी दाखल करावे.आपण हजर राहुन म्हणणे मांडले नाही तर आपले काही म्हणणे नाही,असे गृहीत धरुन प्रकरणी निर्णय देण्यात येईल.याची विशेष नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार यांचे नाव व पत्ता | जामीनदार यांचे नाव व पत्ता | सुनावणी दिनांक | वसुल पात्र रक्कम रुपये | चल / अचल मालमत्तेचे विवरण | शाखा व कर्ज खाते क्र |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. चिकणे ईश्वर भिमराव पत्ता - गंगावाडी, पोस्ट - तलवाडा, ता. गेवराई जि.बीड | 1.श्री. चिकणे ज्ञानदेव भिमराव पत्ता - गंगावाडी, पोस्ट - तलवाडा, ता. गेवराई जि.बीड 2.श्री. उबाळे महेश सखाराम पत्ता - चऱ्हाटा, ता. बीड जि.बीड 3. श्री. चिकणे भिमराव रामभाऊ पत्ता - गंगावाडी, पोस्ट - तलवाडा, ता. गेवराई जि.बीड | 1) 04/04/2025 2) 15/04/2025 3) 29/04/2025 | दि. 31/01/2025 रोजी रु. 40,115 /- व दि.01/02/2025 पासुनचे व्याज व अतिरिक्त खर्च | - | मुख्य शाखा, बीड / कर्ज खाते क्र 193/2000016 |
| 2 | श्री खोड रामेश्वर कचरू पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड | 1.श्री वजगुडे नारायण ज्ञानोबा पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड 2.श्री खोड परमेश्वर जनार्धन पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड 3.श्रीमती खोड स्वाती रामेश्वर पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड | 1) 04/04/2025 2) 15/04/2025 3) 29/04/2025 | दि. 31/01/2025 रोजी रु. 29,798 /- व दि.01/02/2025 पासुनचे व्याज व अतिरिक्त खर्च | - | मुख्य शाखा, बीड / कर्ज खाते क्र 194/2000005 |
| 3 | श्री कचले सुधाकर अर्जुन पत्ता - सौंदाना, पोस्ट - कामखेडा ता.जि.बीड | 1.श्री जगताप अप्पासाहेब विनायक पत्ता - मुरशदपुर, ता.जि.बीड 2.श्री माळी शिवाजी सखाराम पत्ता - सौंदाना, पोस्ट - कामखेडा ता.जि.बीड | 1) 04/04/2025 2) 15/04/2025 3) 29/04/2025 | दि. 31/01/2025 रोजी रु. 36,410 /- व दि.01/02/2025 पासुनचे व्याज व अतिरिक्त खर्च | लि.दे. कर्जदार यांच्या नावावरील मौजे- सौंदाना ग्रा.प. मालमत्ता क्र.207 | मुख्य शाखा, बीड / कर्ज खाते क्र 193/2000003 |

ठिकाण - बीड
दिनांक - 15/04/2025

स्वाक्षरित
उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड

# अवकाळीच्या संकटामुळे कांदा काढणीला वेग!

पुणे : हवामान विभागाने अवकाळीचा इशारा दिल्याने कांदा काढणीस वेग आलेला आहे. शेतकऱ्यांना कांद्याची शेती करताना मॉन्सूनची अनियमितता, त्यामुळे निर्माण झालेला दुष्काळ, कांदा रोपांची टंचाई, रासायनिक खतांचे वाढलेले दर, भरमसाट मजुरी, विजेचा लपंडाव, कांदा निर्यात बंदी या सर्व समस्येला सामोरा जावे लागते. तरीही बळीराजाने चांगल्या दराच्या अपेक्षेने कांद्याची लागवड केली. या सर्व संकटावर मात करीत कांदा पीक काढण्यास आले असतानाच हवामान विभागाने अवकाळीचा इशारा दिल्याने शेतकरी सध्या भर उन्हात कांदा काढणीच्या कामात गुंतला आहे.

यंदाच्या रब्बी हंगामातील कांद्याला लागवडीपासूनच अनेक संकटांचा सामना करावा लागला आहे. सर्व संकटांवर मात करीत कांदा पीक आजमितीला काढणीस आले आहे. त्यातच अवकाळीचे संकट आल्याने शेतकऱ्यांना लवकरात लवकर कांदा काढणी शिवाय पर्याय नाही. नाहीतर पावसाच्या तडाख्यात सापडून संपूर्ण पीक नष्ट होऊ शकते. शेतकऱ्यांसाठी इकडे आड तर तिकडे विहीर यासारखी परिस्थिती उद्भवली आहे.



उन्हाचा तडाखा वाढत असताना शेतकऱ्यांना कांदा काढावा लागत आहे. मागील वर्षी याच दिवसांत प्रचंड गारपीट झाल्याने रब्बी हंगामातील कांदा पीक नेस्तनाबूत झाले होते. भांडवलसुद्धा निघाले नसल्याने कांदा उत्पादक शेतकर्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला होता.

चालू वर्षी तालुक्यात अत्यल्प पर्जन्यमानामुळे सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. बारमाही पाणी असलेल्या विहिरींनी मार्चच्या शेवटी तळ गाठण्यास सुरुवात केली. चालू हंगामात कांदा रोपांच्या टाकण्याच्या वेळी अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली होती. याचा परिणाम कांदा रोपांच्या उतरणीवर झाला. यामुळे चालू रब्बी हंगामात कांदा रोपांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला. कांदा लागवड पूर्ण करण्यासाठी बळीराजांनी सोन्याच्या दरात कांदा रोप खरेदी करून कांदा लागवड केली. रोपांच्या अकल्पित टंचाईमुळे यंदाच्या हंगामात कांदा लागवड ही जानेवारी महिन्यापर्यंत सुरू होती.

## मजुरांची टंचाई

पाणी टंचाई व वाढत्या उन्हाच्या प्रकोपामुळे कांदा पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढला असून, येणाऱ्या उत्पादनात घट निर्माण झाली आहे. त्यातच दरवर्षी बाहेरील मजूर कांदा काढणीसाठी डेरेदाखल होत असतात. यावर्षी सर्वत्र दुष्काळाच्या झळा बसत असल्याने मोठ्या प्रमाणावर मजूर हजेरी लावतील, असा अंदाज बळीराजांकडून बांधला जात होता; पण अद्याप पर्यंत पाहिजे त्या प्रमाणात मजूर उपलब्ध होत नसल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

# कोणत्या महिन्यात कोणत्या पिकांची लागवड करावी



शेतीतून अधिक नफा मिळविण्यासाठी शेतकरी त्यांच्या शेतात अनेक प्रकारची पिके घेतात. जेणेकरून त्यांना बाजारात विकून चांगला नफा मिळू शकेल. कोणत्या महिन्यात कोणता भाजीपाला पिकवायचा याची माहिती घेणे आवश्यक आहे. जेणेकरून शेतकऱ्याला अल्पावधी शेतीतून भरघोस उत्पन्न मिळू शकेल. शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या महिन्यात या भाज्यांची लागवड करावी एप्रिल महिना : या महिन्यात शेतकरी त्यांच्या शेतात फक्त दोन प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड करू शकतात. जसे की राजगिरा आणि मुळा लागवड करता येते. मे महिना : शेतकरी मे महिन्यात त्यांच्या शेतात फुलकोबी, वांगी, कांदा, मुळा आणि मिरचीची लागवड करू शकतात.

जून महिना : जून महिन्यात देशातील शेतकरी त्यांच्या शेतात फ्लॉवर, काकडी, चवळी, कडबा, पेठा, सोयाबीन, भेंडी, टोमॅटो, कांदा, राजगिरा आणि कस्टर्ड सफरचंदाची लागवड करू शकतात. या दिवसांत या भाज्यांचे उत्पन्न चांगले येते. जुलै महिना : शेतकरी या महिन्यांत काकडी, चवळी, कारले, करवंद, कडबा, पेठा, भेंडी, टोमॅटो, राजगिरा आणि मुळा या सुधारित जातींची लागवड करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात. ऑगस्ट महिना : ऑगस्ट महिन्यात शेतकरी त्यांच्या शेतात गाजर, सलगम, फ्लॉवर, बीन, टोमॅटो, काळी मोहरी, पालक, कोंथिबीर आणि राजगिरा या जातीची लागवड करू शकतात. यावेळी चांगले उत्पादन मिळते. सप्टेंबर महिना : शेतकऱ्यांनी आपल्या शेतात भाजीपाल्यापासून अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी गाजर, सलगम, फ्लॉवर, बटाटे, टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, कोथिंबीर एका जातीची बडीशेप आणि ब्रोकोली यांची लागवड सप्टेंबर महिन्यात करावी. ब्रोकोलीच्या जातींची लागवड करता येते. हे सर्व सप्टेंबर महिन्यात चांगले उत्पादन देतात. ऑक्टोबर महिना : शेतकऱ्यांसाठी ऑक्टोबर महिना खूप खास असतो. कारण या महिन्यात शेतकरी आपल्या शेतात अनेक प्रकारच्या भाज्यांची लागवड करू शकतात. जसे की गाजर, सलगम, फुलकोबी, बटाटे, टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, कोहिराबी, धणे, राजमा, मटार, ब्रोकोली, वांगी, कांदे, ब्रुसेल्स स्प्राउट्स या सुधारित जातींची लागवड. लसणाच्या वाणांचे चांगले उत्पादन मिळू शकते, ज्याला बाजारात मागणी जास्त आहे. नोव्हेंबर महिना: या महिन्यात बीटरूट, सलगम, फ्लॉवर, टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, सिमला मिरची, लसूण, कांदा, वाटाणे आणि धणे या जातीची लागवड करता येते. डिसेंबर महिना: शेतकरी डिसेंबर महिन्यात त्यांच्या शेतात टोमॅटो, काळी मोहरी, मुळा, पालक, कोबी, कांदा आणि वांगी यांच्या सुधारित जातींची लागवड करू शकतात.

# कोंबड्यांमध्ये वाढतोय उष्माघात? जाणून घ्या लक्षणे, करा हे उपाय!

सध्या महाराष्ट्रात उष्णतेची लाट सुरू आहे. माणसांप्रमाणे जनावरांना सुद्धा या उष्णतेचा फटका बसत आहे. विशेषतः कोंबड्यांमध्ये उष्माघाताची लक्षणे आढळतात. पुढील काही महिने कोंबडी पालन व्यवस्थापनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात मांसल कोंबड्यांची चढ्या दराने विक्री होते. परंतु उन्हाचा ताण सहन न करू शकल्याने अंडी, मांस उत्पादनात घट दिसून येते.

कोंबड्यांच्या योग्य वाढीसाठी १८ ते २१ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते परंतु ते २८ ते ३० अंश सेल्सिअस पर्यंतचे तापमान सहन करू शकतात. परंतु ३० अंश सेल्सिअसच्या वरती तापमान गेल्यास त्याचा त्यांच्या उत्पादन आणि प्रजोत्पादनावर विपरीत परिणाम होतो. बाह्य तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास प्रति अंश सेल्सिअस तापमान वाढीने ५ टक्के उत्पादन घट होते. जास्त तापमानात कोंबड्यांमध्ये खालील प्रमाणे उष्माघाताची लक्षणे आढळतात.

उष्माघाताची लक्षणे : कोंबड्या तोंडावाटे श्वास घेतात, तोंडाची उघडझाप करून धापा टाकतात त्वचा रखरखीत होते, रंगामध्ये बदल दिसून येतो. पाणी जास्त पितात. भूक मंदावते. पोट जमिनीला घासतात, डोळे बंद करतात, हालचाल मंदावते, सुस्त राहतात. अंडी उत्पादनात घट होते, अंड्याचे वजन कमी होते. अंड्याच्या बाहेरील कवचाची गुणवत्ता कमी होते. शारीरिक वजनात लक्षणीय घट होते, मांसल कोंबड्यांचे वजन कमी होते. प्रजोत्पादन यावर उष्णतेचा विपरीत परिणाम होतो. रोगप्रतिकार शक्तीही कमी होते, त्यामुळे आजारास बळी पडतात. खाद्याचे मांसात वा अंड्यात रूपांतर क्षमता कमी होते. कोंबड्या भिंतीच्या आडोशाला पडून राहतात. काही कोंबड्या पिण्याच्या पाण्याच्या भांड्याजवळ थंड जागेत मान वाकवून बसतात. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी व शरीरात थंडपणा आणण्यासाठी पंख शरीरापासून दूर पसरवितात. दीड किलो पेक्षा अधिक वजनाच्या कोंबड्यांना दुपार ते संध्याकाळच्या वेळी ताप येतो. लालसर होऊन मरतात.

उपाय योजना :

शेड बांधताना घराची लांबी पूर्व-पश्चिम ठेवावी. वायुवीजन व्यवस्था सक्षम असावी. उन्हाळ्यात गादीसाठी लाकूड भुश्याऐवजी भाताचे तूस किंवा भुईमुग टरफलांचा वापर करावा. गादी म्हणून वापरात येणार्या तूसाची जाडी कमी (१ ते १.५ इंच) करावी. कोंबड्यांची संख्या किमान १० टक्क्यांनी कमी करावी. थंड, स्वच्छ, ताजे पिण्यायोग्य पाणी मुबलक प्रमाणात पुरवावे. पिण्याच्या पाण्याची भांडी संख्या दुप्पट वाढवावी. पिण्यासाठी क्लोरीनयुक्त पाण्याचा वापर करावा. यामुळे पाण्यातून होणारे आजार टाळता येतील. पिण्याच्या पाण्यामधून जीवनसत्व (क, ई), सेलेनीअम यांचा वापर करावा. त्यामुळे उष्णतेचा ताण कमी होईल. पिण्याच्या पाण्याची टाकी शेडमध्ये विशिष्ट उंचीवर बसवावी. बाहेरच्या बाजूस बसवली असेल तर त्यास बारदानाची पोती गुंडाळून त्यावर थंड पाणी टाकावे, जेणेकरून आतमधील पाणी थंड राहण्यास मदत होईल. ब्रॉयलर कोंबडीच्या खाद्यात मुख्य ऊर्जा स्रोत म्हणून वनस्पती तेलाचा ४ ते ५ टक्के या प्रमाणात वापर करावा. अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्यात खाण्याचा सोडा वापरावा. अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्य भांड्यात टाकलेल्या खाद्य पृष्ठभाग यावरती शिंपले अथवा मार्बलचे तुकडे थोड्या प्रमाणात पसरावेत. स्प्रिंकलर्स आणि फॉगर्स यांचा वापर हा सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच्या दरम्यान दर १ ते २ तासांनी करावा. खाद्य देण्याचे एक वेळापत्रक ठरवून घ्यावे. त्याचे काटेकोरपणे पालन करावे. खाद्य दिल्यानंतर साधारणतः अर्धा ते दीड तासात कोंबड्यांच्या शरीर तापमानात वाढ होते. यामुळे त्यांच्यावरील उष्णतेचा ताण वाढतो, म्हणून दुपारचे खाद्य देणे टाळावे. बाजूच्या भिंतीच्या जाळीवरती बारदान पोती लावावीत. त्यावर स्प्रिंकलर्सचे पाणी पडेल याची सोय करावी. शेड नेटचा वापर करता येतो. शक्य असल्यास शेडमध्ये कुलर किंवा पंखा याचा वापर करावा. छतावर सूर्यप्रकाश परावर्तित करणाऱ्या पत्र्यांचा वापर करावा जेणेकरून शेडच्या आतील तापमान कमी राखण्यास अधिक मदत होते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६५७ : न्यूयॉर्कमधील ज्यू व्यक्तिंना धर्मस्वातंत्र्य देण्यात आले.
१७१३ : मुघल शासक जहांदार शाह दिल्लीच्या गाद्दीवर बसले.
१७७० : प्रसिद्ध दर्यावर्दी सागर संशोधक कॅप्टन जेम्स कूक यांनी ऑस्ट्रेलिया खंडाचा शोध लावला.
१७७७ : न्यूयार्कने ब्रिटन देशाकडून आपल्या स्वता:च्या स्वातंत्र्याची घोषणा करून एक स्वतंत्रित राज्याच्या रूपाने आपले नवीन संविधान स्वीकारले.
१९३९ : ॲडॉल्फ हिटलरचा ५० वा वाढदिवस जर्मनीमध्ये सार्वजनिक सुटी देऊन साजरा करण्यात आला.
१९४० : आरसीए द्वारा पहिला इलेक्ट्रोनिक्स माईक्रोस्कोप दाखवण्यात आला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजांनी लाइपझिग शहराचा ताबा घेतला.
१९४६ : राष्ट्रसंघ ही संस्था बरखास्त करून पुढे याचेच संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेमध्ये रूपांतर झाले.
१९९२ : खगोलशास्त्राच्या अभ्यासासाठी जगातील सर्वात मोठी व भारतातील पहिली अँटेना पुणे जिल्ह्यातील नारायणगाव जवळील खोडद येथे उभारली गेली.
१९९७ : भारतीय क्रांतिकारक व राजनेता इंद्रकुमार गुजराल भारताचे १२ वे पंतप्रधान बनले.
२००८ : डॅनिका पॅट्रिक ह्या इंडी कार रेस जिंकण्याच्या पहिल्या महिला चालक झाल्या.
२०११ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने आपल्या उपग्रह प्रक्षेपण वाहन 'पीएसएलव्ही' च्या साह्याने तीन उपग्रह यशस्वीपणे अवकाशात पाठवले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५७० : मोहम्मद पैगंबर, इस्लाम धर्माचा संस्थापक.
७८८ : आद्य श्री शंकराचार्य यांचा जन्म
१७४९ : मराठा सत्तेचा ध्वज अटकेपार नेणार्या पेशव्यांचे श्रद्धास्थान असलेल्या देवदेवेश्वर मंदिराची नानासाहेब पेशवे यांनी पर्वतीवर स्थापना केली.
१८०८ : फ्रान्सचे पहिले अध्यक्ष नेपोलियन (तिसरे) यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १८७३)
१८७० : पाकिस्तानी विद्वान आणि भाषाशास्त्रज्ञ तसचं, उर्दू भाषेचे जनक मौलवी अब्दुल हक यांचा जन्मदिन.
१९३९ : ध्रुपद गायक सईदुद्दीन डागर यांचा जन्म.
१८८९ : साली जर्मन शासक व 'राष्ट्रीय समजवादी जर्मन कामगार पक्ष' नेता एडोल्फ हिटलर यांचा जन्मदिन.
१८९६ : सार्थ ज्ञानेश्वरी चे लेखक प्रा. ह. भ. प. शंकर वामन उर्फ सोनोपंत (मामासाहेब) दांडेकर यांचा माहीम, ठाणे येथे जन्म. (मृत्यू: ९ जुलै १९६८)
१८९७ : भारतीय वैदिक अभ्यासक, इंडोलॉजिस्ट पंडित सुधाकर चतुर्वेदी यांचा जन्मदिन.
१९१४ : गोपीनाथ मोहांती, उडिया लेखक.
१९२० : पद्मश्री पुरस्कार प्राप्त भारतीय भजन गायिका ज्योतिका रॉय यांचा जन्मदिन.
१९२४ : हिंदी साहित्याचे प्रसिद्ध समीक्षक आणि पीपल्स राइटर्स असोसिएशनचे संस्थापक व सरचिटणीस चंद्रबली सिंह यांचा जन्मदिन.
१९५० : एन. चंद्रबाबू नायडू, आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री.
१९६५ : मेघालय राज्याचे माजी मुख्यमंत्री व मेघालय राज्यातील विधानसभेचे विद्यमान विरोधी पक्षनेते मुकुल एम. संगमा यांचा जन्मदिन.
१९६६ : याहू चे सहसंस्थापक डेव्हिड फिलो यांचा जन्म.
१९८० : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक अरीन पॉल यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१२ : गॉथिक भयपट कादंबरी ड्रेकुलासाठी प्रख्यात असलेले आयरिश लेखक अब्राहम ''ब्रैम'' स्टोकर यांचे निधन.
१९१८ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ कार्ल ब्राऊन यांचे निधन. (जन्म: ६ जून १८५०)
१९३८ : न्यायाधीश व कायदेपंडित चिंतामणराव वैद्य यांचे निधन. (जन्म: १८ ऑक्टोबर १८६१)
१९६० : सुप्रसिध्द बासरीवादक पन्नालाल घोष.
१९७० : गीतकार आणि शायर शकील बदायूँनी याचे निधन. (जन्म: ३ ऑगस्ट १९१६ बदायूँ, उत्तर प्रदेश)
१९६८ : सुप्रसिध्द भारताचार्य चिंतामणराव विनायक वैद्य.
१९९९ : रुचिरा पुस्तकाच्या लेखिका कमलाबाई कृष्णाजी ओगले याचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९१३)
२००२ : राधाकृष्ण: एक जीवनी आणि जवाहरलाल: एक जीवानीचे लेखक व प्रसिद्ध भारतीय इतिहासकार सर्वपल्ली गोपाल यांचे निधन.
२००४ : भारतीय पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय लोक कलाकार आणि शास्त्रीय गायक कोमल कोठारी यांचे निधन.

# दूधाचे उत्पादन वाढणार; जनावरांच्या आहारात करा या गोष्टींचा समावेश


शेतकऱ्यांचा जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते. तसंच बहुतांश शेतकऱ्यांचा आर्थिक उदारनिर्वाह हा दूध व्यवसायावर अवलंबून असतो. यामुळे शेतकरी पशुची उत्तम काळजी घेतात. तसेच जनावरांचे दूध उत्पादन हे त्यांच्या आहारावर अवलंबून असल्याने खासकरुन शेतकरी त्याकडे जास्त लक्ष देतात. जनावरांना चांगला संतुलित आहार, हिरवा चारा, तेलाची पोळी आणि अन्य आहार दिल्यास जनावरांमधील दूध उत्पादन वाढते. यासोबतच त्यांची प्रतिकारशक्तीही मजबूत असते. यासाठी संतुलित आहाराचा मुद्दा होता. यासोबतच कृषी तज्ज्ञ चांगल्या दर्जाच्या दूध उत्पादनासाठी जनावरांच्या आरोग्यासाठी मोहरीचे तेल देण्याची शिफारस करतात.

आजारी आणि दुर्बल प्राण्यांना मोहरीचे तेल दिल्याने त्यांच्या आरोग्यात चमत्कारीक बदल होतात. मोहरीच्या तेलात भरपूर चरबी असते. ज्यामुळे प्राण्यांना ऊर्जा मिळते आणि ते चपळ होतात. त्यामुळे गायी आणि म्हशींना मोहरीचे तेल देण्याची प्रथा आहे, जेणेकरून त्यांचे आरोग्य लवकर चांगले होईल. मोहरीचे तेल प्यायल्याने जनावरांची पचनशक्ती बळकट होते. त्यामुळे जनावरांना पोटासंबंधीचे आजार होत नाहीत. पशुंना मोहरीचे तेल दिल्याने वासरांची तबेत देखील सुधारते. कारण सुरुवातीला काही दिवस आपण वासरांना जनावरांचे दूध पाजतो. म्हणून वासरांना देखील त्याचा फायदा होतो. थकलेल्या जनावरांना मोहरीचे तेल थोडेसे देणे फायदेशीर ठरते. विशेषत: लांबच्या प्रवासानंतर जनावरे येतात किंवा खरेदी करून आणली जातात. अशा स्थितीत अशक्तपणा आणि थकवा आल्याने ताप येण्याची शक्यता असते. अशा वेळी मोहरीचे तेल दिल्यास प्राण्यांमध्ये लगेच ऊर्जा येत. मोहरीचे तेल जनावरांना खूप उपयुक्त असते.

उन्हाळ्यात उष्णतेपासून सुरक्षा :

उन्हाळ्यात जनावरांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. त्यासाठी पशुपालक देखील पशुची मोठ्या प्रमाणात काळजी घेतात. तसंच उन्हाळ्यात जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन दिल्यास जनावरांना उष्णता संबंधित समस्यांपासून संरक्षण मिळते. दुसरीकडे जर आपण हिवाळ्याबद्दल बोललो तर, या दिवसात मोहरीचे तेल देखील प्राण्यांमध्ये उष्णता टिकवून ठेवण्यासाठी एक फायदेशीर कृती असल्याचे सिद्ध होते. पशुतज्ज्ञांच्या मते निरोगी जनावरांना मोहरीचे तेल आणि पशुखाद्य रोज देऊ नये. या गोष्टी फक्त आजारी आणि अशक्त प्राण्यांसाठीच चांगल्या आहेत.

दरम्यान, आजारी व अशक्त जनावरांना १०० ते २०० मिली मोहरीचे तेलही दिले जाऊ शकते. यापेक्षा जास्त सेवन करणे जनावरांसाठी हानिकारक ठरू शकते. त्याचबरोबर गाई-म्हशींच्या पोटात वायू किंवा पचन खराब झाल्यास पशुवैद्यांच्या सल्ल्याने ४०० ते ५०० मिली मोहरीचे तेलही द्यावे. यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन द्यावे. अन्यथा जनावरांना अन्य आजारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.



# उच्च शिक्षणासाठी केली ८९७ विद्यार्थ्यांना पाच कोटी शहाहत्तर लाखाची मदत

धारूर । प्रतिनिधी

राज्यात सहयोग फांडेशनचे माध्यमातून गेल्या तेरा वर्षा पासून शिक्षण हे विकासाचे मुख्य माध्यम असल्याने हुशार व गरजू एक ही विद्यार्थी आर्थिक परीस्थीती मुळे आपले ध्येय प्राप्त करण्या पासून वंचित राहणार नाही या साठी विद्यार्थी विकास योजनेच्या माध्यमातुन ख-या गरजू विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना उच्च शिक्षणा साठी सर्व परीने सहकार्य केले जाते विद्यार्थी विकास योजना आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ,५९७ विद्यार्थ्यांना, ५ कोटी ८७ लाख रुपये मदत करण्यात आली. देणगीदारा मुळे हे काम यशस्वी झाले .या योजनेच्या नियोजनातील प्रमुख मार्गदर्शक रविंद्र कर्वेजी व नियोजनातील कार्यकर्ता व पालककार्यकरते यांचे संयुक्त मेहनतीचे हे यश आहे हे मात्र निश्चीत हे लिहीत असताना अतिशय आनंद होत आहे की दर वर्षीप्रमाणे सहयोग फाऊंडेशन चे माध्यमातून विद्यार्थी विकास योजनेचे प्रमुख रविंद्रजी कर्वे यांचे प्रमुख मार्गदर्शन खाली राज्यातील होतकरू गरजु विद्यार्थी आर्थिक परीस्थीती मुळे उच्च शिक्षणा पासून वंचित राहु नयेत या साठी विद्यार्थी सहयोग फांडेशन चे माध्यमातून राज्यभरात गेल्या तेरा वर्षा पासून शैक्षणीक विकास हा समाजाचे प्रगतीचे मुख्य माध्यम आहे हे मुलमंत्र ओळखून हे कार्य सुरु आहे.या



प्रवाहातं काम करणारे सर्व प्रमुख कार्यकर्ते व १०० पालक कार्यकर्ते हे सेवाभावी वृत्तीने व राष्ट्र भक्तीने कार्य करतात व सर्व देणगीदार यांच भावनेने मदत करतात.

ज्या विद्यार्थ्यांनी या योजनेच्या सहकार्याने शिक्षण पूर्ण केले अशा विद्यार्थ्यांनी आत्ता पर्यंत रू ५० लाखाहून अधिक रक्कम नवीन विद्यार्थ्यांच्या शिक्षणा साठी परत केली आहे. तेरा वर्षात १९८४ विद्यार्थ्यांना २१ कोटी ६ लाख रुपया वरील योजनेमध्ये समावेश करण्यासाठी विद्यार्थ्याला १०वी मध्ये ९०% हून अधिक मार्क्स १२वी मध्ये ७०% हून अधिक मार्क्स आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विविध प्रवेश परीक्षांमध्ये चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिलाण्या एवढे मार्क्स मिळणे अपेक्षित आहे तसेच संस्थेचा त्या भागातील पालक कार्यकर्ता प्रत्यक्ष गृह भेट करून पालक आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याची आणि घरातील वातावरण शिक्षणाला पोषक असल्याची खात्री करून मगच मदत दिली जाते. विद्यार्थि १०० हून अधिक पाल २०२३-२४ हेही वर्ष सेवा सहयोग फ़ाऊंडेशनच्या विद्यार्थी विकास योजनेसाठी अतिशय उत्तम रीतीने पार पडले. प्रत्येक आकडेवरी मध्ये आधीचे सर्व निकष मागे टाकत नवीन मापदंड प्रस्थापित केले गेले आहेत. अर्थातच याचे श्रेय सातत्याने या योजने मागे उभे असलेले देणगीदार, हितचिंतक, या विद्यार्थ्यांना शोधून काढणारे पालक कार्यकर्ते, विपरीत परिस्थितीतही भव्य दिव्य स्वप्न पाहणारे या योजनेतील लाभ घेणारे विद्यार्थी आणि त्यांच्या मागे पहाडासारखा उभा राहणारा पालक वर्ग या सर्वांना आहे. या सर्वांकडून योजनेसाठी असाच पाठिंबा सातत्याने मिळत राहो आणि एकही कळी परिस्थितीने कोमजून जावू नये हे आपले स्वप्न साकार होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना आहे. या योजनेत सहकार्य केलेल्या विद्यार्थ्याची वार्षीक प्रगती कडे लक्ष ठेवानं ती कायम ठेवण्या साठी त्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते व गुणवत्ता टिकवली तरच पुढची मदत केली जाते.

२०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण ६.६४ कोटी देणगी रूपाने प्राप्त झाले. यामध्ये २.५२ कोटी व्यक्तिगत देणग्यांमधून, १.६९ कोटी रुपये सी. एस. आर. च्या माध्यमातून आणि १.३१ कोटी ट्रस्ट आणि फाउंडेशन्सच्या च्या माध्यमातून प्राप्त झाले. देणग्यांच्या माध्यमातून आलेल्या या रकमेतून ८९७ विद्यार्थ्यांना रू ५.७६ कोटींचे सहाय्य करण्यात आले, ज्यामधील ४३४ विद्यार्थ्यांना या वर्षी प्रथमच मदत केली गेली आहे. यामध्ये ४४९ विद्यार्थी आणि ४४८ विद्यार्थिनींचा समावेश आहे. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची संख्या समसमान आहे याचा आम्हाला अभिमान आहे. हे विद्यार्थी महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांतील आणि बहुसंख्य तालुक्यातील आहेत. याव्यतिरिक्त भारतातील २३ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशातील प्रातिनिधिक विद्यार्थीही आहेत. विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करतानाच दोन शाळांच्या उभारणीसाठी अंशतः मदत म्हणून रू ५७ लाखांचे सहाय्य केले. वरील विद्यार्थ्यांमध्ये इंजिनिअरिंग (३९४), मेडिकल (१७९), नर्सिंग (६६), पदव्युत्तर (५१), डिप्लोमा (४३), सी. ए. (१०) आणि आर्किटेक्चरच्या (६) आणि अन्य विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आजच्या घडीला १३ आय. आय. टी.ज मध्य आपले १८ विद्यार्थी असून ३ एन. आय. टी. ज मध्ये ४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मेडिकलच्या विद्यार्थ्यांपैकी १३४ विद्यार्थी एम. बी. बी. एस., २७ बी. ए. एम. एस., ७ बी. डी. एस., ३ बी. एच. एम. एस. ४ एम. डी. आणि ४ अन्य फॅकल्टीजचे शिक्षण घेत आहेत.

आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे विद्यार्थी विकास योजनेचा प्रशासकीय खर्च केवळ १.०७% एवढा कमी ठेवण्यात आपण यशस्वी झालो आहोत. अर्थात याचे श्रेय मुख्यतः निरपेक्षपणे आणि निःस्वार्थीपणे काम करणारे आपले पालक कार्यकर्ते आणि अन्य सहकारी यांना आहे हे ही नमूद केले पाहिजे. सर्वांच्या सहकार्याने विद्यार्थी विकास योजनेच्या कामाचा परीघ दिवसेंदिवस विस्तारत जाईल याचा आम्हाला विश्वास आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील आपल्या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे परीश्रमा मुळे हे यश मिळाले असून या पेक्षा जोमाने हे कार्य या पुढे केले जाणार असून डिग्री कोर्सेसला शासकीय कोट्यातून लागलेल्या विद्यार्थ्यांना सहकार्य केले जाणार असुन राज्यातील कुठलाच हुशार बुध्दीवान विद्यार्थी उच्च शिक्षणा पासून गरीब आर्थिक परीस्थीती मुळे वंचित राहणार नाही या साठी सहयोगी फाउंडेशन विद्यार्थी विकास योजनेच्या माध्यमातुन काम राज्यभरात करत आहे व हे अविरत सुरु राहणार आहे.

# भगवानगडाच्या माऊलीं मंदिरासाठी पाष्टा ग्रामस्थांची ४८ लाख रुपये देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन

शिरूर । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडावर होणाऱ्या नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत.गडाच्या भक्तवर्गापैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे.देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात.नंतर संपूर्ण



ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह. भ. प. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे पाष्टा येथे सप्ताहानिमित्त आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले.त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले.जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ४८ लाख रुपये झाली.नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत.एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे.या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे.त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# विकाराधीनतेमुळे अनंत समस्या निर्माण होतात - मातकर महाराज

बीड । प्रतिनिधी

शिवणी ता.जि.बीड येथे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे महंत ह.भ.प.नवनाथ महाराज व भवानी गडाचे महंत ह.भ.प. अखंडानंद महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व ह.भ.प.शिवाजी महाराज खिळदकर, जवळेकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात सहाव्या दिवसाची कीर्तनसेवा श्री शिवाजी विद्यालय बीडचे पर्यवेक्षक ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांची संपन्न झाली.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या म्हणवोनी शरण जावे सर्व भावे देवासी तो हा उतरली पार भवसागर नदीचा या अभंगावर अतिशय मंत्रमुग्ध करणारे चिंतन केले. प्राप्त झालेल्या मनुष्य देहाची सार्थकता कशात आहे, हे आधी समजून घेतले पाहिजे परंतु आपण माणसं विकाराधीन जीवन जगत असल्याने सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. विद्यार्थी ,पालक, समाज संभ्रमात आहेत. हा संभ्रम फक्त अध्यात्मिक नाही तर जीवनविषयक आहे. मनुष्य जन्माची कर्तव्य मनुष्य विसरत चालला आहे. हाच संभ्रम दूर



करण्यासाठी संत अवताराला येऊन अट्टाहासाने सांगण्याचा प्रयत्न करतात. संत विचार हा आनंदी जीवनाचा मूलमंत्र आहे.संतांचा उपदेश हा समाजाच्या नुसता हिताचाच नाही तर उद्धारक असतो. मनुष्य देहच या देव प्राप्तीचे साधन आहे आणि देव म्हणजे सुख किंवा आनंद होय. म्हणून शरण जाण्यासाठी एकच ठिकाण आहे ते म्हणजे भगवान पांडुरंग.अशा भगवंताचे सर्व भावे शरण जावे. जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज म्हणतात, म्हणवोनी शरण जावे सर्व भावे देवासी आपण सर्व भावांनी भगवंत शरणागती पत्करली पाहिजे. काया,वाचा,मन या सर्व भावांनी देवाला शरण गेलो की देव आपणास भवसागरातून तारून नेतो तो हा उतरील पार भवसागर नदीचा असं या अभंगावर अतिशय अभ्यासपूर्ण निरूपण केले. साथसंगतीसाठी गायक बंडू महाराज जटाळ, शिवाजी महाराज शिंदे,भागवत महाराज, श्रीमंत शिंदे, जालिंदर शिंदे व मृदंग वादक सखाराम महाराज यांची होती. कीर्तनासाठी शिवणीचे सरपंच अजय शिंदे, शिवसंग्रामचे बीड तालुकाध्यक्ष विजयराव सुपेकर, प्रा.विलासराव शिंदे, ग्रामपंचायत सदस्य पवन शिंदे, बळीराम शिंदे,भाऊसाहेब शिंदे, श्रीमंत शिंदे,रंगनाथ शिंदे, रामचंद्र कुंटे, विनोद कुटे, भास्कर शिंदे, नारायण शिंदे यांच्यासह शेकडो भाविक उपस्थित होते.

# गोमळवाडा येथील सप्ताहाची सांगता



शिरूर: । प्रतिनिधी

तालुक्यातील गोमळवाडा येथील शांतीब्रम्ह संत वै.भागवत बाबा यांची चौदावी पुण्यतिथी व संस्थानचे अधिष्ठान असलेल्या प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सव यांचे औचित्य साधून रक्तदान,ज्ञानदान आणि अन्नदानासह सप्ताह सोहळ्याची मोठया उत्साहात सांगता झाली.या वेळी श्री क्षेत्र नारायणगडाचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज यांची विशेष उपस्थिती होती.वै.भागवत महाराज यांचा चौदावा पुण्य स्मरण सोहळा व त्यांनी प्रतिस्थापित केलेल्या रामचंद्राचा जन्मोत्सव श्रीराम संस्थानवर महंत भानुदास शास्त्री यांचे अध्यक्षतेखाली व ग्रामस्थ, पंचक्रोशिच्या सहकार्यातून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.याही वर्षी हा सोहळा अकरा ते अठरा एप्रील दरम्यान संपन्न झाला.ज्ञानदानासाठी दिग्गज किर्तनकार तर अन्नदानासाठी ग्रामस्थासह पंचक्रोशी व रक्तदानासाठी तरूणांनी आपले योगदान दिले.

महंत भानुदास शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी रक्तदान शिबीरासाठी पुढाकार घेतला व स्वत: रक्तदान करून रक्तदान हे सर्वश्रेष्ट दान आहे हा संदेश देऊन सामाजिक बांधीलकी जोपासली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,सौ.कुमीदीनी संदीपान काकडे,प्रदीप तावरे,गणेश बारगजे,अक्षय शिंदे यांचेसह आदी अनेक तरूण व महिलांनीसुद्धा रक्तदान केले. या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्रीराम संस्थानचे महंत भानुदास शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होऊन उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी गोमळवाडा, रूपूर, हिंगेवाडी, राक्षसभुवन, वडाळी, कोळवाडी, पिंपळनेर, वाघीरा, इंदौर आदी ठिकाणासह परिसरातील भाविकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# गजानन विजय ग्रंथाच्या सामुदायीक पारायण सोहळ्याचे अयोजन

## श्री योगेश्वर मंदीरमध्ये विवीध धार्मीक कार्यक्रमाची रेलचेल

अंबाजोगाई

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेली ११ वर्षापासु श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी

३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला येथे करण्यात आले आहे. या चार दिवसीय उत्सवात श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सव सोहळा संपन्न होणार आहे.तरी सर्व भावीक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

ह.भ.प.वै दत्तात्रय जोशी महाराज नळेगाव यांच्या आशीर्वादाने हभप.श्री आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने गेली ११ वर्षापासु श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण,भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन केले जाते. मंडळाचे हे १२वर्ष आसुन ३ मे ते ६ मे २०२४ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन श्री योगेश्वर मंदीर हॉल वरचा मजला अंबाजोगा येथे करण्यात आले आहे.चैत्र कृ शु १० शुक्रवार ३ मे २०२४ रोजी पहाटे ४ वा मंगलध्वनीने सुरवात होणार आसुन पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती, सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण - अध्याय १ ते ७,दु ४ वा भक्तीसंगीत मातृस्वर संगीत विद्यालय व समुह अंबाजोगाई सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प.लक्ष्मीप्रसाद बुवा पटवारी, माजलगाव यांचे सायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन होणार आहे.तर शनिवार ४ मे पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण अध्याय ८ ते १४ त्यानंतर आरती, दु ४ वा भक्तीसंगीत,स्वररंग संगीत विद्यालय - शैलेश पुराणिक,तालस्पर्श तबला अकादमी - रत्नदिप शिगे व पोस्टमास्तर भागवत पाठक यांची बासरी वादन होणार आसुनसायं ६.३० ते ८.३० नारदीय किर्तन ह.भ.प. बाळु बुवा नाव्हेकर गंगाखेड यांचे होणार आहे. रविवार ५ मे रोजी पहाटे रुद्राभिषेक व आरती सकाळी ७ ते १० अध्याय १५ ते २१ त्यानंतर ग्रंथपुजन, ग्रंथदिंडी, पारायणारती , सायंकाळी ६ वाजता श्री गजानन महाराजांचा पालखी उत्सव सोहळा श्री योगेश्वरी मंदीर - मंडी बाजार - पाटील चौक - जयवंती पुला पासुन - कुंभार गल्ली -श्रीगणेश साई मंदीर - मंगळवार पेठ - गुरवार पेठ मार्गेश्री योगेश्वरी मंदीरात येणार आहे.६ मे २०२४

पहाटे रुद्राभिषेक व आरती,सकाळी १० वा काल्याचे किर्तन : ह.भ.प. श्री शाम महाराज नेरकर(शास्त्री)त्यानंतर महाआरती व महाप्रसाद सायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई संचलित, 'सत्संग श्री गजाननाचा' व ''श्रींची'' दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता श्री योगेश्वर मंदीर हॉल येथे होणार आसुन भावीक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे अवाहान श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ अंबाजोगाई यांच्या च्या वतीने करण्यात आले आहे

# रिपाइंकडून ईदचे आयोजन:कागदे

बीड । प्रतिनिधी

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेल्या रमजान ईदचे औचित्य साधून सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी दरवर्षीप्रमाने याहीवर्षी शनिवार (दि.२०) एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ नंतर रात्री ८ या वेळेत बशीर गंज चौक बीड येथे बीड शहर रिपाइंच्यावतीने ईद मिलाफ कार्यक्रम आयोजन केले आहे.शनिवार (दि.२०) एप्रिल २०२४ रोजी बीड शहरात रिपाइंच्या वतीने रमजान ईदचे औचित्य साधून आयोजित केलेल्या ईद-मिलाफच्या कार्यक्रमास हिंदू मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे,

मझरखान,सिद्दिकी फारुकी, राजू जोगदंड, रमेश गंगाधरे, किसन तांगडे, सय्यद जफर, रफिक भाई, सुलतान बाबा, नरुल खान, फरहान बागवान, रणजीत शिंगारे, कपिल खान वसीम बागवान, मुखीद बागवान, आबेद बागवान, अख्तर फारुकी, सैफ फारुकी, मीरान फारोखी, आदींनी केली आहे.

# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ

## डॉ. लहाने, डॉ. दिपक कटारे यांची प्रमुख उपस्थिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या २०१८ च्या बॅचचा पदवी प्रदान समारंभ मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त संचालक पद्मश्री डॉ. टी. पी. लहाने, प्रख्यात -हदयरोग तज्ञ डॉ. दिपक कटारे, संभाजी नगर येथील हेडगेवार रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. तुपीकर, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या २०१८ च्या एमबीबीएस बॅचचा पदवीप्रदान समारंभ १५ एप्रिल रोजी येथील आर्यवीर मंगल कार्यालयाच्या लॉन्सवर मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. यावेळी प्रसिद्ध नेत्रतज्ञ तथा वैद्यकीय शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त संचालक पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धापटे, छत्रपती संभाजीनगर च्या हेडगेवार रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. तुपीकर आणि स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे



माजी विद्यार्थी व प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ. दीपक कटारे यांना या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. हा कार्यक्रम स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित व संचालित केला होता. या कार्यक्रमासाठी सर्व पदवीधर विद्यार्थ्यांचे पालक व कुटुंबीय, तसेच ज्येष्ठ-कनिष्ठ वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्रमुख पाहुण्यांच्या सत्काराने झाली. डॉ. तात्याराव लहाने यांनी आपल्या भाषणात स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांना सांगितला. त्यांनी विद्यार्थ्यांना रुग्ण व त्यांच्या कुटुंबाशी कसे वागावे हे समजावून सांगितले आणि डॉक्टर म्हणून आपल्या प्रवासात आपल्या पालकांना विसरू नये असे आवाहन केले.तर अधिष्ठाता डॉ. शंकर धापटे म्हणाले की आता तुम्ही सर्व पदव्युत्तर शिक्षणा साठी जाणार आहात आणि सर्व विषयांना सारखे महत्त्व आहे, त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन केले.

डॉ. दीपक कटारे यांनी वर्षानुवर्षे वैद्यकीय पद्धत कशी बदलत आहे व वैद्यकीय व्यवसायातील सध्याच्या आव्हाना बाबदमाहिती देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. जीवनातील सकारात्मक दृष्टिकोन आणि डॉक्टरांच्या सामाजिक जबाबदाऱ्यांवर या विषयावर सर्वाधीक भर दिला. कार्यक्रम हिप्पोक्रेटीसच्या शपथविधीने संपन्न झाला.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात 'प्रयोजनमूलक हिंदी' अभ्यासक्रम



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील हिंदी विभागामार्फत आयोजित 'प्रयोजनमूलक हिंदी' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम नुकताच संपन्न झाला.

यानिमित्त १८ एप्रिल रोजी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या हस्ते अभ्यासक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. एक महिना कालावधी असलेला हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम हिंदी विभागाच्या वतीने प्रतिवर्षी आयोजित करण्यात येतो. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कार्यालयीन हिंदी, हिंदी भाषेतील व्यावहारिक शब्द, रोजगारातील संधी आदी विषयावर मार्गदर्शन केले जाते. हा अभ्यासक्रम चालविण्यामागे राजभाषेचा प्रचार व प्रसार करणे व हिंदी संभाषण कौशल्ये विकसित करणे हाही एक प्रमुख उद्देश आहे. प्रमाणपत्र वितरणप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख डॉ. न. पु. काळे व डॉ. दिलीप गिन्हे उपस्थित होते. अभ्यासक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी प्रा. जयंत साठे यांचेही सहकार्य लाभले.

# अंबाजोगाईमध्ये गुटखा वाहतुक करणारी ओमीनी कार पकडली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई उपविभाग मध्ये चालणारे अवैध धंद्यांची गोपनिय माहीती काढुन कडक कारवाई करण्याचे आदेश वरीष्टांनी दिले होते. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की अंबाजोगाई येथुन चनई रोडने एक पांढर्या रंगाचे ओमीनी चार चाकी कार मध्ये गुटखा विक्री साठी वाहतुक केली जात आहे अशी माहीती मिळालेवरुन मौजे डोंगरपिंपळा येथे हनुमान मंदीराचे समोर स्थानिक गुन्हे शाखेने सापळा लावुन थांबले असता समोरुन येणार्या कारला हाथ करुन थांबवले असता कार जागीच थांबवुन गुटखा वाहतुक करणारा ईसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला त्याची माहीती



घेतली असता त्याचे नांव कृष्णा मुकुंद भालेकर रा. स्वातंत्र सैनिक कॉलणी, मोरेवाडी ता अंबजोगाई असे होते त्याचे ताब्यातुन शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधीत पान मसाला गुटखा व एक चार चाकी ओमीनी कार असा एकुण १,१५,०६६ रु मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं ११६/२०२५ अन्वये पोलीस हवालदार विकास राठोड यांचे फिर्यादीवरुन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पळुन गेलेला कृष्णा मुकुंद भालेकर याचा शोध पोलीस घेत आहेत. सदरील कारवाई हि श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, महेश जोगदंड, राजु पठाण, नितीन वडमारे, विकी सुरवसे यांनी केली आहे.

# दिव्यांग विशेष शिक्षक शिक्षण आयुक्त कार्यालय समोर आमरण उपोषण करणार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकार व प्रशासन ३१०५ दिव्यांग विशेष शिक्षकांना सेवेत कायम समायोजन करण्यासाठी दिरंगाई करत असल्याने या शिक्षकांनी अमोल उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्यातील समग्र शिक्षा अभिमानातील कंत्राटी विशेष शिक्षक हे तुटपुंज्या मानधनावर पदावर गेली १५-२० वर्ष सेवा देत असलेल्या विशेष शिक्षकांचे सेवेत समावेश करणारा जि.आर.दि. ८ ऑक्टोबर २०२४ रोजी.राज्य सरकारने निर्गमित केला असुन आज सात महिने उलटून गेली आहेत. त्यांच्या अंमलबजावणी साठी दि.२४ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा परिषद मुख्याधिकारी याच्या अध्यक्ष ते खाली कागद पडताळणी करूण देखील तीन महिन्याचा कालावधीत उलटून गेली तरिही आजुन प्रयन्त ३१०५ विशेष शिक्षकांना सेवेत कायम च्या आदेशाच्या प्रतीक्षेत ठेवत.प्रशासन अधिकारी विशेष शिक्षक परिक्षा घेत आसुन ह्यात सगळ्या विशेष शिक्षकांचा संयम सुटत असल्यामुळे दि २४ एप्रील २०२५ पासुन महाराष्ट्र राज्य शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालनालय प्राथमिक यांच्या कामातील दिरंगाई मुळे कार्यालया समोर दिव्यांग कल्याण विशेष शिक्षक संघटनेचा वतीने आमरण उपोषणाला बसणार आसल्याचा इशारा दिला असुन आंणि दि. १ मे २०२५ आत सेवेत कायम समायोजन करणारा आदेशाचे प्रत प्रत्येक विशेष शिक्षक मिळाली नाही तर मुंबई मंत्रालय लॉग मार्च काढणार आसलेचे दिव्यांग कल्याण विशेष शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सरताज पठाण पदाधिकारी व राष्ट्रीय दृष्टीहिन महाराष्ट्र राज्य .ह्यानी पाठिंबा देत आपन हि विशेष शिक्षका सह हजारो दिव्यांग विधार्था व पालक समाजातील बंधु-भगिनींना घेऊन लढा देणार आसलेचे प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे.

# आनंदगाव येथील कै.रमेश थावरे स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आनंदोत्सव साजरा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात इंग्रजी शाळांच्या रूपाने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कारकीर्द घडवण्याचे आदर्श काम केले जातय, विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळवण्यासाठी करत असलेल्या कामाचे समाधान असल्याचे मत आयुष्यमान भारत मिशन चे राज्य अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले.माजलगांव तालुक्यातील आनंदगाव येथील कै.रमेशराव थावरे प्री प्रायमरी स्कूल च्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आनंदोत्सवाचे



आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते.

आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, सौ.शिल्पा शेटे,लक्ष्मण पोटभरे, सुप्रसिद्ध डान्सर वैभवी टाकणखार, संस्था अध्यक्ष रोहित थावरे यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती.शहरी भागाबरोबरच आता ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासाचा प्रवाह धावत असल्याचे चित्र ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत कुठेही कमी नसल्याचे दिसताना ग्रामीण भागातील इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांच्या सार्वभौम विकासासाठी तत्पर असल्याचे मत आयुष्यमान भारत मिशन चे राज्य अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले.विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.बाल चिमुकल्या विद्यार्थीनी विविध सामाजिक , धार्मिक, लोकप्रिय गितांवर या प्रसंगी नृत्य सादर करित उपस्थितांची मने जिंकली.वैष्णवी थावरे, अभिजीत थावरे,सुरज थावरे,अजय थावरे, ऋषीकेश थावरे,प्राचार्या दिपाली स्वामी,साक्षी रांजवन,सुरेखा डिग्रसकर, अश्विनी कस्तुरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# जल व्यवस्थापनसाठी जलसंपदा विभागाची गावागावात जनजागृती अभियानात गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद -विजय पाखरे

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्य शासनाने भविष्यात पाण्याची होणारी टंचाई व यावर मात करण्यासाठी आत्ताच त्याचे व्यवस्थापन कसे करायचे याचे पंधरवडा नाहीतर कायम स्वरूपी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.यासाठी जलसंपदा विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या जल व्यवस्थापन च्या जनजागृती अभियानात गावकऱ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद असल्याचे आष्टी येथील जलसंपदा विभागाचे उप अभियंता विजय पारखे यांनी केले आहे.

जल व्यवस्थापन कृती





पंधरवडा दिनांक १५ ते ३० एप्रिल२०२५ या कालावधीमध्ये जलसंपदा विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.शुक्रवार (दि.१९) रोजी आष्टी तालुक्यातील वाळुंज येथे ते शेतक-यांना मार्गदर्शन करतांना पारखे बोलत होते. यावेळी रोहिणी दरेकर,बबन झगडे,राजू आजबे, कोमल कांबळे, रोहन हाडोळे, देविदास गुंड, व्यंकट दांडगे, कविता आमदार, रविंद्र निकाळजे, महसुल मंडळ अधिकारी,कृषी सहाय्यक स्नेहल भोसले,ज्येष्ठ नागरिक बलभीम खाडे, सरपंच सुरेश सातपुते,लालासाहेब वीर,रघुनाथ शिंदे, यांच्यासह आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य सोसायटीचे चेअरमन व वाळुज येथील सर्व शेतकरी बांधव कार्यक्रमासाठी उपस्थित होते.पुढे बोलतांना पाखरे म्हणाले,

येथुन पुढे शेतीसाठी पाणि हे ठिबकद्वारे च द्यावे जेणे करुन पाणि पिकाला लागेल तेवढे मिळेल व पाण्याची नासाडी न होता मोठ्या प्रमाणावर बचत होईल.

पान ३ वर

# दिंद्रुड येथे आज फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी

**डॉ. लेंडाळ व डॉ. बारवकर हॉस्पीटलच्या वतीने गरजूंनी लाभ घेण्याचे आवाहन**

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव येथील डॉ. लेंडाळ हॉस्पीटल व तालुक्यातील दिंद्रुड येथील डॉ. बारवकर हॉस्पीटल, क्रांतीसुर्य प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने दिंद्रुड येथे आज (दि२०) रविवार रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त रुग्णांची मोफत भव्य आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या शिबिराचा परिसरातील गरजू रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ. लेंडाळ व डॉ. बारवकर हॉस्पीटल च्या वतीने करण्यात आले आहे.**

आयोजित शिबिरात हृदय विकार, बीपी, ईसीजी, दम लागणे, किडनी विकार, किडनी स्टोन, लघवी अडकणे, मधुमेह तपासणी, बालरोग तपासणी व निदान, त्वचा, गुप्त रोग, संधिवात, दमा, टि.बी., फुफुसाचे विकार, ॲनिमिया, इतर रक्ताचे विकार यांसारख्या आदि आजारांवर व वृद्धांच्या विविध आजारांपासून ते नवजात शिशूं च्या उपचारा पर्यंत मोफत आरोग्य तपासणी निदान व उपचार येथील क्रांतीसुर्य प्रतिष्ठान, बारवकर व माजलगाव च्या लेंडाळ हॉस्पीटल च्या विद्यमाने गरजूंना मोफत आरोग्य तपासणी व निदान मिळावे यासाठी शिबिराचे आयोजन डॉ. सचिन बारवकर यांनी केले आहे. तज्ञ डॉ. प्रताप लेंडाळ हे ही मोफत तपासणी करणार आहेत. पंचक्रोशीतील दोन्ही तालुक्यातील जनतेने व गरजूंनी या मोफत शिबीराचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. बारवकर यांनी केले.

# जामखेड सौताडा राष्ट्रीय महामार्गाचे नियमानुसारच काम होणार अतिक्रमणे निघणार ? उपमुख्यमंत्री अजित पवार

जामखेड । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून जामखेड सौताडा राष्ट्रीय महामार्ग रखडलेला आहे. याबाबत संबंधित अधिकारी यांना लवकरात लवकर रिपोर्ट करावयास सांगितले अतिक्रमणे का निघत नाहीत काय अडचण आहे, ठेकेदार का लवकर काम करत नाही यासाठी वेळप्रसंगी मी नितीन गडकरी साहेबांशी बोलेल व लवकरात लवकर रस्ता पुर्ण करण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे अजित पवार म्हणाले. मी रस्त्यांची कामं करण्यासाठी वेळप्रसंगी लोकांशी वाईटपणा घेतला. काही जणांची घर काढावी लागल्याचे



पवार यांनी सांगितले.

जामखेड मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते यावेळी माजी आमदार लहू कानडे, युवक प्रदेशाध्यक्ष धीरज शर्मा, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे, उमेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रा. सचिन गायवळ, तालुकाध्यक्ष महेश निमोणकर बाळासाहेब शिंदे, शरद नवले, बाळासाहेब नाहटा राजेंद्र गुंड, प्रशांत शेलार, बापुराव शिंदे, धिरज पाटील, कपील पवार, भगवान पाचपुते, ऋषिकेश शेलार, नंदुरबार मुंडे, सुरज रसाळ, अक्षय शिंदे यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अनेक पक्ष प्रवेश झाले

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित अहिल्यानगर जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, जामखेड मध्ये माजी नगरसेवक राजू ओव्हळ,

पान ३ वर

# बुलढाणा अर्बन बँकेचे अध्यक्ष राश्यामजी चांडक यांना मिळालेली पुरस्काराची रक्कम केली गोशाळेसाठी दान

**बीड । प्रतिनिधी**

येथे बुलढाणा बँकेचे संस्थापक अध्यक्ष माननीय राधेश्यामजी चांडक (भाईजी )यांना सहकार क्षेत्रातील अतिशय उत्तम कामगिरी त्यांनी केल्यामुळे बीड येथे काही दिवसापूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित दादा पवार यांच्या शुभ हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये लोकाशा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते त्यामध्ये त्यांना सन्मानपत्र स्मृतिचिन्ह व रोख एक लाख रुपये देऊन राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला होता .

याप्रसंगी माननीय सहकार महर्षी राधेश्यामजी चांडक (भाईजी ) यांनी मनोगत व्यक्त करताना जी रोख रक्कम एक लाख रुपये देण्यात आली होती त्यामध्ये अजून स्वतःचे २५ हजार रुपये देऊन बीड येथे गोसेवेचे कार्य करणारी साध्वी प्रीतीसुधाजी गोरक्षण केंद्र नामलगाव फाटा येथे ही रक्कम देण्याची त्यांनी घोषणा केली . त्याप्रमाणे आज त्यांनी २९ क्विंटल सरकी पेंड देऊन त्यांनी एक आदर्श निर्माण केला .या कौतुकस्पद निर्णयामुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे स्वतःच्या संस्थेची बुलढाणा येथे त्यांची गोशाळा आहे आपल्या गोशाळेला ही रक्कम न देता बीड येथे अतिशय उत्कृष्ट दर्जाची सेवा साध्वी प्रीतीसुधाजी गोरक्षण केंद्राच्या माध्यमातून केली जाते .येथे असलेल्या २०० पेक्षा जास्त गोमाते करिता त्यांनी आज २९ क्विंटल सरकी पेंड देऊन आदर्श निर्माण केलेला आहे याप्रसंगी माननीय राधेश्यामजी चांडक ( भाईजी ) बुलढाणा यांनी सर्व बीड करांना बीड जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी असलेल्या गोशाळेंना सर्व नागरिकांनी गुळ , पेंड , चारा देण्याचे आवाहन सुद्धा त्यांनी केलेले आहे .कारण भारतीय संस्कृतीमध्ये गाईला खूप अन्यसाधारण

पान ३ वर

## अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

# एकनाथजी शिंदे सर्वसामान्यांचा आधार- अनिलदादा जगताप

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या



नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ, सूरज गायकवाड, अमित गायकवाड, शुभम आखाडे, संदेश सावंत, विशाल

पान ३ वर

# बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेचा खरा चेहरा उघड

## उसने म्हणून १० लाख रुपये खात्यावर पाठवलेले गुत्तेदार सुदर्शन काळे यांची पोलिसात तक्रार

**मुलाच्या फी भरण्यासाठी डिसेंबर महिन्यात घेतले होते पैसे, पुराव्यांसह काळेची तक्रार**

**याच दहा लाखांवरून कासले करत होता भलतेच आरोप, सर्व आरोप खोटे निघाले**

**बीड । प्रतिनिधी**

बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचा आणखी एक कारनामा उघड झाला आहे. रणजित कासले स्वतःच्या खात्यावर दहा लाख रुपये धनंजय मुंडे यांच्या माणसांनी पाठवले असे सांगत होता, ते पैसे मुळात अंबाजोगाई येथील संत बाळू मामा कन्स्ट्रक्शन चे मालक सुदर्शन काळे यांनी पाठवले असल्याचे उघड झाले आहे.

याबाबत आता सुदर्शन काळे यांनीच स्वतः पोलिसात पैसे दिल्याच्या पुरावा सहित तक्रार दाखल केली आहे.

रंजीत कासले हा पोलीस उपनिरीक्षक असताना मागील वर्षी अंबाजोगाई येथे कार्यरत होता, त्या काळात आपली त्याच्याशी ओळख झाली. डिसेंबर २०२४ मध्ये रणजीत कासले याने आपल्या लातूर येथे शिक्षण घेत असलेल्या मुलाच्या फीची अडचण असल्याचे सांगत दहा लाख रुपयांची उसनवारी ने मागणी केली.

एका कामाचे बिल आल्यानंतर मी त्यांना त्यांच्या ॲक्सिस बँकेच्या वैयक्तिक खात्यावर ते दहा लाख रुपये पाठवले. विशेष म्हणजे त्यावेळी त्यांनी मला दुसऱ्या एका अनोळखी व्यक्तीच्या खात्यावर पैसे पाठवण्याचा आग्रह केला होता मात्र मी तसे न करता वैयक्तिक त्यांच्याच बँक खात्यावर पैसे पाठवले. त्यांनी लवकरच ते पैसे परत देतो, असे सांगितले होते. साधारण दीड ते दोन महिने उलटल्यानंतर मी त्यांना पैशाची परत मागणी केल्यावर त्यांनी टाळाटाळ केली. माझे पैसे मला गरजेच्या वेळी परत न दिल्यास मी त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले, किंवा त्यांनी गुजरात मधून मला काही रक्कम पाठवली. तसेच सायबर ठाण्यातील गिरी नामक कर्मचाऱ्यांच्या हाताने दोन लाख रुपये, असे तीन वेळा मिळून साडे सात लाख रुपये परत दिले आहेत. तर उर्वरित अडीच लाख रुपये परत मिळवून द्यावेत, अशी मागणीही काळे यांनी आपल्या तक्रारीत केली आहे. सुदर्शन काळे यांनी आपल्या तक्रारी सोबत कासले याला पैसे पाठवल्याचे पुरावे देखील जोडले आहेत. या तक्रारीची दखल घेऊन पोलीस प्रशासन कासले वर काय कारवाई क याकडेही आता लक्ष लागले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पीएसआयच्या बहिणीचा खून; आरोपीला पुण्यात बेड्या

पुणे । प्रतिनिधी

पोलिस उपनिरीक्षकाच्या बहिणीच्या डोक्यात मारून तिचा खून करून पुण्यात पळून आलेल्या आरोपीला शिवाजीनगर पोलिसांनी नरवीर तानाजीवाडी परिसरात बेड्या ठोकल्या. विशाल ईश्वर वाळके (वय ४०, रा. सुयोगनगर, नवेगाव, गडचिरोली) असे या गुन्हेगाराचे नाव आहे. तर कल्पना केशव उंदिरवाडे (वय ६४, रा. कल्पना विहार, सुयोगनगर, नवेगाव, ता. जि. गडचिरोली) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत श्रेणी पोलिस उपनिरीक्षक मोहन काशीनाथ सोनकुसरे (वय ५७, रा. इंदिरानगर, लांझेडा, ता. जि. गडचिरोली) यांनी गडचिरोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मोहन सोनकुसरे हे श्रेणी पोलिस उपनिरीक्षक असून ते गडचिरोली पोलिस मुख्यालयात कार्यरत आहेत. त्यांची मोठी बहीण कल्पना उंदिरवाडे या जिल्हा परिषदमध्ये कक्ष अधिकारी होत्या. तेथून त्या २०१८ मध्ये सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पतीचे २०२२ मध्ये निधन झाले आहे. घरात त्या आणि त्यांचा मुलगा उत्कल (वय २५) हे दोघेच राहतात.



तिला मूलबाळ नसल्याने तिने उत्कल याला १० दिवसांचा असताना दत्तक घेतले आहे. १३ एप्रिल रोजी ते दुपारी मुख्यालयात जात असताना त्यांना कल्पना या घरात पडलेल्या असून त्यांच्या डोक्यातून रक्त येत असल्याचे समजले. ते त्यांच्या घरी गेले असताना कल्पना या बेडरुममध्ये रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. कोणीतरी त्यांच्या डोक्यात हत्याराने वार करून त्यांचा खून केला होता. या वेळी उत्कल हा परीक्षेसाठी गेला होता. गडचिरोली पोलिसांनी तपास करताना त्यांचा भाडेकरू विशाल वाळके याच्याकडे प्राथमिक चौकशी केली.

त्यानंतर पोलिसांनी त्याला दुपारनंतर पुन्हा बोलविले होते. परंतु, विशाल हा तेथून पळून गेला. पोलिसांनी केलेल्या तपासात विशाल याने कल्पना यांच्या मोबाईलवरून काही व्यवहार केल्याचे निष्पन्न झाले. तसेच, आदल्या दिवशी रात्री उशिरापर्यंत तो त्यांच्या घरात असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे पोलिसांचा विशालवरील संशय वाढला होता. चोरीच्या उद्देशाने त्याने हा खून केल्याची प्राथमिक माहिती आहे. विशाल वाळके याचा सर्वत्र शोध सुरू होता.

विशाल वाळके हा शिवाजीनगर येथील नरवीर तानाजीवाडीमध्ये असल्याची माहिती शिवाजीनगर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी गुरुवारी सकाळी त्याला पकडले. गडचिरोली पोलिस दलातील स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक राहुल आव्हाड व पोलिस उपनिरीक्षक दीपक चव्हाण हे पुण्यात आल्यावर त्यांच्याकडे विशाल वाळके याला हवाली केले.

ही कामगिरी अपर पोलिस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, पोलिस उपायुक्त संदिपसिंग गिल, सहायक पोलिस आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, पोलिस निरीक्षक (गुन्हे) चंद्रकांत सूर्यवंशी, पोलिस हवालदार प्रमोद मोहिते, गणेश चौबे, बाबा आहेर, पांडुरंग माने, महावीर वलटे, सचिन जाधव यांच्या पथकाने केली.

# भिगवणच्या यात्रेत यंदा गौतमी पाटीलचा जलवा

भिगवण : भिगवण येथील यात्रोत्सवाच्या बैठकीत झालेल्या गदारोळामुळे यात्रेला यंदा गालबोट लागणार की काय, असे वाटले होते. परंतु, आता मात्र भिगवणची यात्रा एकोप्याने, तीही उत्साहात साजरी करण्याचा निर्णय एकमुखाने झाला आहे. त्यातच लावण्यावती गौतमी पाटील ही रंगमंचावर आपली अदा व जलवा दाखवणार आहे. कुस्तीच्या आखाड्यात महाराष्ट्र केसरी पै. सिकंदर शेख आपला डाव दाखवणार असल्याने भिगवणची यात्रा विविध मनोरंजनामुळे धडाक्यात साजरी होणार आहे.

भिगवणचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांची यात्रा सोमवार (दि. २१) व मंगळवारी (दि. २२) पार पडत असली तरी यात्रा चार दिवस चालणार आहे. रविवारी (दि. २०) अन्नदात्यांनी महाप्रसाद कार्यक्रम ठेवला आहे तर बुधवारी (दि. २३) महिलांसाठी 'दिलबरा तुमच्यासाठी' हा



मनोरंजनाचा कार्यक्रम ठेवला आहे. भिगवणची यात्रा जुने भिगवण व पुनर्वसित गावठाण अशा दोन ठिकाणी भरवली जाते. त्यानिमित्त दोन्ही मंदिराभोवतालची साफसफाई करून विद्युत रोषणाईचे काम प्रगतीपथावर आहे. यात्रेची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती सरपंच गुराप्पा पवार, उपसरपंच सत्यवान भोसले, मंदिराचे पुजारी सोमनाथ व गोपाळ गुरव यांनी दिली.

रविवारी पहाटे नवीन गावठाण मंदिर ते जुने मंदिरापर्यंत महिलांची दंडवत घालण्याची परंपरा आहे. सकाळी सहा वाजता भैरवनाथ महाराजांना अभिषेक घालून यात्रा आरंभ होणार आहे. त्यानंतर ९ वाजता मुखवटे व पोशाख, सायंकाळी चार वाजता शेरणी वाटप, ८ वाजता छबिना प्रस्थान, रात्री ११ वाजता शोभेचा दारूगोळा व १२ वाजता मनोरंजनपर फुलवंती ऑर्केस्ट्रा होणार आहे.

मंगळवारी सकाळी ८ वाजता मान वाटप, ९ वाजता आखाडा पूजन आणि १० वाजता प्रसिध्द नृत्यांगना गौतमी पाटील गाण्यावर थिरकणार आहे. संध्याकाळी आखाड्याचे प्रमुख आकर्षण महाराष्ट्र केसरी पै. सिकंदर शेख यांच्यासह इतरही नामवंत पैलवान आखाड्यात उतरणार आहेत. बुधवारी महिलांसाठी 'दिलबरा तुमच्यासाठी' हा मनोरंजनपर कार्यक्रम ठेवण्यात आला आहे.

# पुणे पोलिसांची धडक कारवाई; १४ वर्षे फरार असणाऱ्या आरोपीला बेड्या

पुणे: खून प्रकरणात १४ वर्ष फरार असलेल्या, तसेच मुंबईतील लुटमारीच्या गुन्ह्यातील आरोपीला गुन्हे शाखेने गजाआड केले. समीर अशोक भागवत (वय ४३, रा. नॅशनल पार्क, माणिक बाग, सिंहगड रस्ता ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याने कुरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०११ मध्ये सराइत नीलेश चौगुले याच्यासोबत लूटमारीचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.



गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पथक गस्त घालत होते. त्या वेळी सहायक पोलीस फौजदार पंढरीनाथ शिंदे आणि पोलीस कर्मचारी अमित बोडरे यांना खून प्रकरणात १४ वर्ष फरारी असलेला आरोपी समीर भागवत हा सिंहगड रस्ता परिसरातील गोयलगंगा सोसायटीजवळ येणार असल्याची माहिती मिळाली. २००८ मध्ये वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत त्याने एकाचा खून केला होता, तसेच मुंबईतील कुरार पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध लुटमारीचा गुन्हा दाखल झाला होता.

सापळा लावून भागवतला पोलिसांनी पकडले. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंगराव पवार, तुपसौंदर, पंढरीनाथ शिंदे, अमित बोडरे, कैलास लिम्हण, सुजीत पवार, चेतन शिरोळकर, अक्षय गायकवाड, अर्चना वाघमारे, भाग्यश्री वाघमारे यांनी ही कारवाई केली.

# सुदृढ समाज निर्मितीसाठी युवकांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करावे : प्रा. नितिन बानगुडे पाटील

जुनी सांगवी : सुदृढ आदर्शवत समाज निर्मितीसाठी युवकांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून रोजच्या जिवनात त्यांचे संस्कार अंगिकारले पाहिजेत. ध्येयपूर्तीसाठी लक्ष्य असणे गरजेचे आहे.त्यासाठी कष्टाची अभ्यासाची खडतर परिश्रमाची तयारी असली पाहिजे. जुनी सांगवी येथील फिनिक्स सोशल ऑर्गनायझेशन आयोजित 'संयुक्त जयंती महोत्सवाच्या पहिल्या दिवसाच्या व्याख्यानमालेत प्रा.नीतिन बानगुडे पाटील यांनी 'चला नवीन पिढी घडवुया' विषयावर व्याख्यानात बोलताना सांगितले.

आज समाजात संस्कारक्षम पिढी तयार करायची असेल तर, आजच्या नवीन पिढी वर योग्य संस्कार व्हायला हवे. युवकांमधील वाढती व्यसनाधीनता रोखण्यासाठी



पालकांनी मुलांवर योग्य संस्कार करायला हवेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी सगळ्या जाती धर्माची माणसं सोबत घेऊन पुढे गेले. त्यांनी माणसा-माणसात भेद केला नाही. परस्त्रीचा मातेसमान आदर राखणे ही त्यांची शिकवण आहे. मात्र आजची पिढी नक्की कोणत्या दिशेने जातेय? हा प्रश्न उपस्थित होतो.ही चिंताजनक बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात की, तुम्हाला माणूस म्हणून जगताना केवळ पैसा महत्वाचा नसून माणसाचे, शील, विनय, नीतीमत्ता अधिक महत्त्वाची आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्यांसाठी ज्या गोष्टी सांगितल्या त्या आजही तशाच्या तशा लागू पडतात. त्यात काहीही बदल झालेला नाही. वैचारिक गुलामगिरी नष्ट न झाल्याने, पिढी कालची असू द्या अथवा आजची. शोषण होतच राहते. त्यात बदल केवळ प्रश्न पडणारी जीवंत मनाची माणसं करु शकतात. जो रण गाजवतो त्याला विर म्हणतात जो मनावर राज्य करतो त्यास महावीर म्हणतात.त्या दिशेने युवकांनी ध्येय ठेवायला हवे. व्याख्यानास दापोडी, पिंपळे गुरव,नवी सांगवी, जुनी सांगवी सह परिसरातील श्रोत्यांनी मोठी उपस्थिती लावली होती. व्यासपिठावर राजू साळवे,प्रा.राजाभाऊ भैलुमे, डॉ.प्रकाश रोकडे,यश ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत बाराथे, बाळासाहेब सोनवणे, फिनिक्स सोशल ऑर्गनायझेशनचे रविंद्र यादव, माजी नगरसेवक संतोष कांबळे, आरंभ महिला प्रतिष्ठानच्या तृप्ती कांबळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे कमलाकर जाधव, बंडोपंत शेळके, हर्षल कांबळे,जय गणेश क्रिकेट क्लबचे युवक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुर्यकांत वराडकर यांनी केले.

# पुण्यातील दोन बड्या अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

## ५० लाखांची लाच मागितल्याचा गंभीर आरोप

पुणे : पुणे जिल्ह्यातील भूअभिलेख विभागाचे दोन वरिष्ठ अधिकारी सध्या अडचणीत आले आहेत. जमिनीच्या मोजणीसंदर्भात ५० लाख रुपयांची लाच मागितल्याच्या गंभीर आरोपांनंतर उप-अधिक्षक अमरसिंह पाटील आणि भूकरमापककिरण येटोळे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी तक्रारदारानं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे थेट तक्रार केली होती. त्यानंतर प्रशासनाने लक्ष घातल्यानं हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, पीडिताने २०२३ पासून पुणे ग्रामीणमधील एका शेतजमिनीची मोजणी व हद्द निर्धारण प्रक्रियेबाबत सातत्यानं अर्ज करूनही अधिकारी टाळाटाळ करत होते. याच दरम्यान, अमरसिंह पाटील व किरण येटोळे यांनी कामासाठी ५० लाखांची मागणी केल्याचा



आरोप आहे.

एवढंच नाही तर, हेलिकॉप्टर शॉट लावतो अशा प्रकारची धमकी दिल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या तक्रारीनंतर पुणे शहरातील आर्थिक व सायबर गुन्हे शाखेनं प्राथमिक चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# पुण्यात रेंज रोव्हर भरधाव चालविणाऱ्या अल्पवयीनसह वडिलांविरुद्ध गुन्हा

पुणे : पुणे शहरातील पोर्शे कारचे प्रकरण देशभर गाजले होते. यामध्ये अल्पवीन मुलाने केलेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. मात्र त्यानंतरही बड्या बापाची धेंडे सुधारण्याचे नाव घेण्यास तयार नाही. अशाच एका प्रकरणात महाविद्यालय परिसरात भरधाव वेगाने रेंज रोव्हर गाडी चालविणाऱ्या एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन वडिलांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सिंहगड महाविद्यालयाच्या वडगाव येथील कॅम्पसमध्ये घडली.

याप्रकरणी पोलीस शिपाई सचिन घोरपडे यांनी दिलेल्या तक्रारीनूसार व्यवसायीक महेश प्रकाश बिडकर (वय ४७, रा.शिवसागर, सनसिटी) यांच्याविरुध्द सिंहगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात




आला आहे. फिर्यादी सचिन घोरपडे हे सिंहगड पोलीस ठाण्याअंतर्गत कॉप्स २४ मार्शल म्हणून कार्यरत आहेत. ते सहकाऱ्यांसह गुरुवारी रात्री वडगाव येथे गस्त घातल होते.

तेव्हा त्यांना सिंहगड महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये रेंज रोव्हर गाडी भरधाव वेगाने जा-ये करताना दिसली, त्यांनी गाडी अडवून चालकास विचारणा केली असता, तो अल्पवयीन असल्याचे आढळले. या गाडीमध्ये दोन अल्पवीन मुलेही होती. गाडीसंदर्भात चौकशी केली असता ही गाडी त्याच्या मृत आजोबांच्या नावावर असल्याचे लक्षात आले. तसेच, गाडीचा वापर त्याचे वडील महेश बिडकर करीत असल्याचे सांगितले. दरम्यान, अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधिन करण्यात आले.

# शाळांमध्ये सीबीएसीई पॅटर्न व हिंदी भाषेची सक्ती खपवून घेणार नाही - सुप्रिया सुळे

पुणे : केंद्र सरकारचे नवीन शैक्षणिक धोरण राज्यात रेटून नेण्याचा प्रयत्न सुरु आहे. शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न व हिंदी भाषा सक्तीची करण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. एसएससी बोर्डाचा अभ्यासक्रम सर्वोत्तम आहे, सीबीएसईचा पर्याय द्या, मात्र सक्ती करू नका. मराठी भाषा प्रत्येकाला आली पाहिजे, हिंदी किंवा अन्य भाषा पर्याय म्हणून ठेवा.' अशा शब्दात खासदार व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारला सुनावले.

खासदार सुळे शनिवारी पुणे दौऱ्यावर होत्या. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. सुळे म्हणाल्या, सीबीएसई पॅटर्नसाठी शिक्षक देखील अजून तयार झालेले नाही. बालभारतीची पुस्तके व एसएससी बोर्डाचा अभ्यासक्रमाची देशाने दखल घेतलेली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाद्वारे मराठी भाषेवर अन्याय करण्याचा प्रकार सुरू असून आम्ही तो खपवून घेणार नाही. मराठी भाषा प्रत्येकाला आली पाहिजे, इतर भाषा मुलांच्या पालकांना निर्णय घेण्यासाठी पर्याय म्हणून ठेवाव्यात. भाषेची सक्ती करणे योग्य नाही. प्रत्येक राज्य आपापल्या भाषांना प्राधान्य देते, मग महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य का नाही ? '



शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत सुळे म्हणाल्या, सरकार कोणाचेही असू द्या, गुन्हेगारी शून्य झाली पाहिजे. जितेंद्र आव्हाड यांनी एका महिलेला अमानुषपणे मारहाण झाल्याचा प्रकार व्हिडीओद्वारे पुढे आणला. त्यावर आरोप - प्रत्यारोप झाले. त्याच्यात राजकारण आणणे हे दुर्दैवी आहे. पोलिसांनी सगळे समोर आणले पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी देखील विरोधकांवर आरोप करू नयेत, आम्ही ते खपवून घेणार नाही. राज्यापुढे आर्थिक आव्हान आहे. देशातील विकसित राज्यांमध्ये आपल्या राज्याचा नंबर पहिल्या पाच-दहामध्ये दिसत नाही. विकसित राज्ये सिंगल इंजिनवाले आहेत, एकही राज्य डबल इंजिनवाले नाही.'

केंद्राच्या योजनांबद्दल त्या म्हणाल्या, केंद्राने मोठा खर्च करून जलजीवन योजना आणली. जलवाहिन्या टाकल्या, पण अजूनही पाणी आलेले नाही. करोडो रुपये खर्च करूनही शेवटच्या माणसाला पाणी का मिळत नाही. जलजीवनबाबत माझ्या मतदारसंघातील श्वेतपत्रिका काढण्याबाबत मी सरकारला सांगत आहे, पण सरकार का काढत नाही. पाण्यासाठी लोकांची जीव जात आहेत, लोकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. असे काय व्यवस्थापन करण्यात आले की, ज्यामुळे उजनी धरणातील पाणीसाठा शून्य टक्यापर्यंत खाली आला. '

दीनानाथबाबत सरकारचा अहवाल धक्कादायक

ईश्वरी भिसे या गर्भवती महिलेच्या मृत्यूसंबंधी दीनानाथ रूग्णालयाचा सरकारने दिलेल्या अहवालाचा मी निषेध करते. हा अहवाल जाळून टाका. सरकारचा असा अहवाल देऊ कसा शकते ? आम्ही ते अहवाल मानत नाहीत, आम्ही या प्रकरणी थेट न्यायालयात दाद मागणार आहोत. महिलेला न्याय देण्याऐवजी सरकार डॉक्टर व रुग्णालयाला वाचवत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. सरकारने कोणालाही वाचवावे, पण आम्ही न्यायासाठी रस्त्यावर उतरू. सरकार सत्य लपवू शकत नाही, अशा शब्दात सुळे यांनी दीनानाथ मंगेशकर रूग्णालयासंबंधी सरकारला धारेवर धरले.

# भोरच्या संग्राम थोपटेंचा पक्षाला राजीनामा, राज्यात काँग्रेसला मोठा धक्का! भाजपमध्ये प्रवेश करणार

पुणे : राज्यातील काँग्रेसच्या गोटातून एक मोठी बातमी समोर आली आहे. संग्राम थोपटे यांनी अखेर काँग्रेसला राजीनामा (डरपसीरा ढहेरींश ठशीळसपरींळेपें उेपसीशीी) दिला आहे. शिवाय ते लवकरच भाजपमध्ये पक्ष प्रवेश करणार असल्याची माहिती पुढे आली आहे. हा पक्ष प्रवेश करण्याच्या आधी थोपटे यांनीद २० एप्रिलला काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली असून या बैठकीत ते पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून ते आपली पुढील घोषणा करणार असल्याची शक्यता आहे. या बैठकीला तालुक्यातील सर्व समर्थक उपस्थित राहणार असल्याची ही चर्चा आहे. संग्राम थोपटे हे काँग्रेसचे बडे नेते असून ते तीन वेळा आमदार होते. तर त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे सहा वेळा भोर विधानसभेचे आमदार होते.



त्यामुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळातील एक बडा नेता भाजपच्या वाटेवर असल्याने राज्यात हा काँग्रेसला मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

काँग्रेसचे कट्टर समर्थक आणि भोर येथील मोठं राजकीय घराणं म्हणून थोपटे कुटुंबियांकडे बघितलं जातं. त्यातच संग्राम थोपटे हे काँग्रेसचे बडे नेते असून ते तीन वेळा आमदार होते. तर त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे सहा वेळा भोर विधानसभेचे आमदार होते. मात्र नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी संग्राम थोपटे यांचा पराभव केला होता. अशातच संग्राम थोपटे हे गेल्या काही दिवसांपासून नाराज असून ते पक्षाला राम-राम करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत होती.


दरम्यान विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभव, तसेच कार्यकर्त्यांना टिकवून ठेवण्यासाठी सत्तेची आस, हे मुख्य कारण पुढे करत त्यांनी अखेर पक्षाला राजीनामा दिला असल्याचे बोललं जात आहे. मात्र महाविकास आघाडीतील बडे बडे नेते भाजपच्या कंपूत विराजमान होत असताना पुण्यातील आणखी एक बडा नेता भाजपच्या वाटेवर असल्याने काँग्रेसला पुण्यात हा मोठा झटका असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आगामी काळात संग्राम थोपटे नेमकी काय भूमिका घेतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# निगडीमध्ये दाम्पत्यास मारहाण; डोक्यात सिमेंटचा ब्लॉक घातला

पिंपरी । प्रतिनिधी

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या बातम्या उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. माझ्याबाबत इतरांना वाईट का सांगतोस, असे म्हणत एका तरुणाने दाम्पत्याला सिमेंट ब्लॉकने मारहाण करून जखमी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना साईनाथनगर, निगडी येथे बुधवारी (दि. १६) दुपारी घडली आहे. गणेश चंद्रकांत पवळे (४४, रा. साइनाथ नगर, निगडी) यांनी गुरुवारी (दि. १७) याबाबत निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आकाश सिताराम गायकवाड (२३, रा. साईनाथनगर, निगडी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी आरोपी गायकवाड हा फिर्यादी पवळे यांच्या घरी आला. त्याने फिर्यादी यांना शिवीगाळ करीत घराबाहेर बोलविले आणि म्हणाला की, तू माझ्याबाबत नागेश चिखले याला वाईट का




सांगितले, अशी विचारणा केली. त्यावेळी फिर्यादी यांनी मी कोणालाही तुझ्याबाबत वाईट सांगितले नाही. तुझा काहीतरी गैरसमज झाला असल्याचे म्हणाले. यामुळे चिडलेल्या आरोपी गायकवाड याने सिमेंट ब्लॉक फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केले. फिर्यादी यांना वाचविण्यासाठी त्यांची पत्नी आली असता आरोपीने त्यांच्या पायावर सिमेंट ब्लॉक मारून जखमी केले. निगडी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.